रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २६३ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28 www.krushival.in

**उद्या अंक नाही**

आज सोमवार, दि. २ मार्च २०२६ रोजी होळीनिमित्त 'कृषीवल' कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक व हितचिंतकांनी दखल घ्यावी, ही विनंती.

- मुख्य संपादक


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २ मार्च २०२६

किंमत ४ ₹


होळी व धुलिवंदनच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

## वेधक

### गेल कंपनीत कामगाराचा मृत्यू

**रायगड** : अलिबाग तालुक्यातील गेल कंपनीमध्ये काम करणाऱ्या कामगाराचा मृत्यू झाला. यावेळी कंपनी प्रशासनाकडून भरपाई देण्यास टाळाटाळ करण्यात आली. मात्र, नातेवाईकांनी या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त करत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. अखेर कंपनीतील एका एजन्सीने अखेर भरपाई देण्यास होकार दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. हृदय विकाराच्या झटक्याने कामगाराचा मृत्यू झाल्याचे एसकेबी पान २ वर

### मंदिरांचे दरवाजे बंद

**मुंबई**: या वर्षातील पहिले पूर्ण चंद्रग्रहण मंगळवारी (दि.३) होणार आहे. त्याचा मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांच्या वेळेवर मोठा परिणाम होणार आहे. यादिवशी दक्षिण मुंबईतील कुलदेवी मुंबा देवी ते प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. चंद्रग्रहण काळात शुभकार्ये आणि मूर्तींना स्पर्श करण्यास कडक बंदी असल्याने मुंबईतील बहुतेक मंदिरांनी दुपारपासून दर्शन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रहण संपल्यानंतर मंदिरांचे शुद्धीकरण करून भाविकांना पुन्हा प्रवेश दिला जाईल.

### गॅस पुन्हा महागणार?

**मुंबई** : मध्य पूर्वेतील तणाव वाढत असल्याने पुन्हा चिंता निर्माण होत आहेत. विशेषतः एलपीजी आणि एलएनजीचा पुरवठा धोक्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात गॅस सिलिंडरच्या किमती वाढू शकतात. कतार हा जगातील सर्वात मोठ्या एलएनजी निर्यातदारांपैकी एक आहे. अनेक आशियाई देशांना त्याच्या पुरवठ्याचा मोठा भाग मिळतो. भारत आणि चीनसारखे देश कतारकडून मोठ्या प्रमाणात गॅस खरेदी करतात. या पुरवठ्यात कोणताही व्यत्यय आल्यास किमतींवर थेट परिणाम होऊ शकतो.

### स्कुटीची ट्रेलरला धडक; दोघांचा मृत्यू

**पनवेल** : जुना मुंबई-पुणे महामार्गावरील कोन बिट पोलीस चौकी समोरून जाणाऱ्या ट्रेलरला स्कुटी चालकाने समोरून धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात स्कुटीवरील दोघे गंभीर रित्या जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. असद मेमन शमशद (१९) व मुस्कान संजय सिंग (२०) असे मृतांचे नाव आहे. हे दोघे स्कुटीवरून जात असताना स्कुटी चालकाचा स्कुटीवरचा ताबा सुटला आणि तो थेट समोरून येणाऱ्या ट्रेलरला धडकला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# महावितरणचा 'शॉक'

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**वीज सेवा सुरळीतपणे पुरवूनही अनेक ग्राहकांकडून वेळेवर वीज बिलाचा भरणा होत नाही. त्यामुळे महावितरण कंपनीच्या महसुलावर ताण येत आहे. थकीत बिलांची वाढती रक्कम लक्षात घेता महावितरणने कडक कारवाईचा अवलंब करत गेल्या ४ महिन्यांत ३० हजार ३७१ ग्राहकांचे वीज कनेक्शन खंडित केले आहेत.**




रायगड सर्कल अंतर्गत अलिबाग, पनवेल, रोहा आणि गोरेगाव हे चार विभाग असून, त्याअंतर्गत १७ उपविभाग कार्यरत आहेत. या विभागांमार्फत जिल्ह्यातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. वीज पुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने पूर्ववत करण्यासाठी यंत्रणा सज्ज असते. दर महिन्याला वापरानुसार ग्राहकांना बिल वितरित केले जाते. काहींना ऑनलाईन माध्यमातून तर काहींना कागदी स्वरूपात बिल दिले जाते. मात्र, काही ग्राहकांकडून सातत्याने बिल भरण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे दिसून आले आहे.

महावितरणचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. त्याअंतर्गत नोव्हेंबरमध्ये ९,९६५, डिसेंबरमध्ये ६,२८६, जानेवारीमध्ये ६,६५० आणि फेब्रुवारीमध्ये ७,५८० अशा एकूण ३०,३७१ ग्राहकांचे वीज कनेक्शन बंद करण्यात आले. नागरिकांनी वेळेवर बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी केले आहे.

### वीजचोरांवर धडक कारवाई

जिल्ह्यात वीजपुरवठ्याचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारलेले असतानाही काहीजण अनधिकृतरित्या वीज वापरण्याचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले आहे. फेब्रुवारी महिन्यात महावितरणने वीज चोरीविरोधात विशेष मोहीम राबवून ३२४ प्रकरणे उघडकीस आणली. या कारवाईत सुमारे ९९ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी ७२ जणांनी ४३ लाख रुपयांचा भरणा केला असून उर्वरित २५२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. एका प्रकरणात गुन्हा नोंदविण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे. वीजचोरीमुळे महसुलाचे नुकसान होऊन प्रामाणिक ग्राहकांवर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम होतो. त्यामुळे अनधिकृत वापर टाळून कायदेशीर मार्गानेच वीज घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# रोहा तालुक्यात सापडला पाचवा किल्ला



**नंदकुमार मरवडे**

**| खांब |**

- रायगड टूर गाईडच्या सदस्यांचे यश
- इतिहासात लवकरच नोंद होणार

आतापर्यंत रोहा तालुक्यामध्ये अवचितगड, घोसाळेगड, सुरगड आणि बिरवाडी गड (भवानी गड) अशा चार किल्ल्यांची नोंद होती; मात्र, आता सह्याद्री मधले भटके आणि रायगड टूर गाईडच्या सदस्यांनी रोहा तालुक्यातील इतिहासाच्या आणि काळाच्या ओघात लुप्त झालेला किल्ला शोधून काढला आहे.

वाळंजवाडी गाव परिसरात आणि पहूर गावच्या वाटेवर एक डोंगर आहे. त्याला पूर्वी गोमाशीचा डोंगर असे नाव होते. तसेच, पहूर वाळंजवाडी आणि सभोवतालचा प्रदेश हा ऐतिहासिक शिल्प, वीरगळ व सतिशीला यांनी समृद्ध आहे. त्याचा संदर्भ घेऊन रायगड टूर गाईड सर्विसचे आनंद सानप यांनी भोवतालच्या परिसरात शोध मोहिमा आणि अभ्यास मोहिमांना सुरुवात केली. त्यांनी ही संकल्पना त्यांचे सहकारी कृष्णराम जाधव, किशोर सावरकर, सौरभ घरट व दत्तात्रेय सावंत काका यांना दिली. याआधी रायगड टूर गाईडच्या सदस्यांनी गेल्या दीड-दोन वर्षात वेगवेगळ्या शोध मोहिमा पार पाडल्या आहेत. त्यांनी या शोध मोहिमेत देखील सहकार्य करण्याची सहमती दर्शवली आणि त्याचे सार्थकझाले. याशोधमोहीमेदरम्यान वाळंज वाडी परिसरात असणाऱ्या आणि पहूर बाजूकडील असणाऱ्या गोमाशीच्या डोंगरावर त्यांना किल्ल्याचे काही अवशेष आढळून आले. त्यात त्यांना आठ पाण्याचे टाक, कौलाची खापरे, मटक्याची खापरे, तटबंदी, दगडाचे चीरे व विटांचे अवशेष असे भरपूर सारे ऐतिहासिक अवशेष मिळाले आहेत. त्यावरून हा डोंगर नसून हा एक किल्लाच आहे, असा निष्कर्ष काढण्यात आला. त्या अनुषंगाने लवकरच रोहा तालुक्यामध्ये पाचव्या किल्ल्याची ऐतिहासिक नोंद केली जाणार आहे. पान २ वर

# रस्ते बांधणीत मोठा भ्रष्टाचार

**ठाकरे गटाची चौकशीची मागणी**

**| पनवेल | प्रतिनिधी |**



पनवेल महानगर पालिकेत रस्ता बांधणीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे जाळे असून, कामाचा दर्जा सुमार असल्याने येथील रस्ते काही महिन्यांतच खराब होत आहेत. तेव्हा येथील रस्ते बांधणीतील भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधित ठेकेदार आणि पर्यवेक्षक अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी महापौर नितीन पाटील यांच्याकडे केली आहे.

राजकारणी हस्तक्षेप करून अनेकदा अनुभवहीन कंत्राटदारांना मोठ्या निविदा मिळवून देत आहेत. त्यामुळे कामाचा दर्जा घसरतो. कंत्राटदार आधीच संगनमत करून निविदा भरतात, त्यामुळे निविदा प्रक्रिया पारदर्शक न राहत भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत आहे. डांबरी रस्त्याचे आर्युमान सुमारे १५ वर्षे आहे. परंतु, पनवेल महानगरपालिका अंतर्गत पावसाळ्यापूर्वी केलेले डांबरी रस्ते केवळ १ ते २ महिन्यातच खराब झाले आहेत. त्यामुळे या भ्रष्टाचाराविरोधात शिवसेना (ठाकरे गट) संघटनेने आंदोलन करून महानगरपालिकेला कुलूप लावले होते. त्यावेळी निकृष्ट कामांबद्दल कंत्राटदार व संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्यावर प्रशासनाने कारवाई करणे आवश्यक होते. परंतु, पनवेल महानगरपालिकेने अधिकृत भूमिका आजपर्यंत स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे भष्ट्राचाराला चालना मिळत आहे. तेव्हा शासन आदेशाचे पालन करून पालिका हद्दीत झालेल्या रस्ते पान २ वर

### लाखोंची फसवणूक करणारा गजाआड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल जवळील करंजाडे येथील रामचंद्र मालुसरे यांच्या निमिषा फोटो शॉपमध्ये एका व्यक्तीने विविध प्रकारचे कॅमेरे व इतर वस्तू भाड्याने घेलते. त्यानंतर त्याने ते परत न केल्याने त्याने लाखोंची फसवणूक केल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. संजय पांडुरंग कदम असे फसवणूक करणाऱ्याचे नाव आहे. यादरम्यान, संजय कदम याने मोबाईल नंबर बंद करून तीन राज्यातील राहण्याचे पत्ते बदलुन परागंदा झाला होता. त्यामुळे त्याचा शोध लागणे कठीण झाले होते. मात्र, पनवेल पोलिसांच्या पथकाने संजय कदमने वापरलेल्या मोबाईल नंबरचे तांत्रिक माहिती व विश्लेषणाच्या पान २ वर

# २०१३चा भूसंपादन कायदा लागू करण्याची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

- साडेबावीस टक्के भूसंपादनाला विरोध
- सरकार, सिडको प्रशासनाकडून कायद्याकडे दुर्लक्ष

सिडकोच्या साडेबावीस टक्के भूसंपादन योजनेच्या विरोधात न्यायालयाने नवी मुंबई विमानतळासाठी २०१३ च्या भूसंपादन कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे तिसऱ्या मुंबईसह उरणमधील सिडकोच्या लॉजिस्टिक पार्क, रिजनल पार्क तसेच विरार-अलिबाग कॉरिडॉर या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठीही या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

युपीए सरकारच्या काळात देशातील भूसंपादनाचा सक्तीचा १८९४चा ब्रिटीश कालीन भूसंपादन कायदा रद्द करून त्या जागी २०१३चा नवा भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा लागू करण्यात आला आहे. हा कायदा २०१४ पासून अंमलात आला आहे. मात्र, महाराष्ट्र राज्य सरकार आणि सिडकोकडून भूसंपादन करतांना हा कायदा अंमलात आणला जात नाही. त्या ऐवजी शेतकऱ्यांकडून संमती पत्र घेऊन भूसंपादन केले जाते आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमीन आणि भूखंडाला अधिकचा दर देण्यासाठी न्यायालयात दाद मागता येत नाही. शिवाय या कायद्यात शेतकऱ्यांना बाजार दराच्या ४ ते ६ टक्के अधिक दर, तसेच संपादित जमिनीच्या २० टक्के विकसित भूखंड, बागायती जमीनीसाठी अधिकचा दर, तसेच समुद्रात मासेमारी करणाऱ्यांचाही या पुनर्वसन कायद्यात समावेश करण्यात आला आहे. याच संदर्भात नवी मुंबई विमानतळ व सिडको लॉजीस्टिक पार्क बाधीत शेतकरी उच्च न्यायालयात पान २ वर

# कर्जत-कल्याण मार्गावर अपघात

### मोहाची वाडीतील तरुणाचा मृत्यू

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत - कल्याण राज्यमार्गावर नेरळ पोलीस ठाण्याजवळ असलेल्या पुलावर एक भीषण अपघात घडला. या अपघातात मोहाची वाडी येथील चंद्रकांत ऐनकर (४५) यांचा जागीच मृत्यू झाला. होळीसारख्या उत्साहाच्या सणादरम्यान ही दुर्घटना घडल्याने संपूर्ण नेरळ परिसरात शोककळा पसरली आहे.

चंद्रकांत ऐनकर हे आपल्या दुचाकीवरून नेरळ बाजारपेठेत काही वस्तूंच्या खरेदीसाठी गेले होते. बाजारातील काम आटोपून ते पुन्हा आपल्या घराकडे परतत असताना, नेरळ पोलीस ठाण्याजवळील पुलाला त्यांची दुचाकी धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, चालक ऐनकर पुलावरून खाली कोसळले. या गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नेरळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी रुग्णवाहिका बोलावून ऐनकर यांना तात्काळ उपचारासाठी रायगड हॉस्पिटल येथे हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या अपघातामुळे कर्जत-कल्याण मार्गावरील रस्त्यांच्या नियोजनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राज्यमार्गाचे रुंदीकरण काही ठिकाणी झाले आहे, तर काही ठिकाणी रस्ता अत्यंत अरुंद आहे. त्यामुळे वाहनचालकांचा गोंधळ उडतो. नेरळ पोलीस ठाण्याजवळील पूल दोन विभागांत विभागलेले आहेत. त्यांना जोडणारा रस्ता एक पदरी आहे. दोन पूल आणि त्यांना जोडणारा हा अरुंद रस्ता वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत आहे. याच तांत्रिक त्रुटीमुळे चंद्रकांत ऐनकर यांचा अपघात झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यात खामेनींचा मृत्यू

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या इराणवरील संयुक्त हल्ल्यानंतर संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणची राजधानी तेहरानवर अनेक भीषण हल्ले केले आहेत. इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर इराणने प्रतिहल्ले केले असून युद्धाचा भडका उडाला आहे. दरम्यान, अमेरिका आणि इस्त्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचा मृत्यू झाल्याचा दावा अमेरिका आणि इस्रायलने केला आहे. इराणच्या वृत्तवाहिन्यांनीही या वृत्ताला दुजोरा दिला आहे. यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल-अमेरिका संयुक्त कारवाईत खामेनी ठार झाल्याचा दावा केला होता. अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर काही तासांतच, अनुभवी धर्मगुरू आणि खामेनी यांचे जवळचे सहकारी अयातुल्ला अलीरेजा अराफी यांना तात्पुरते इराणचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच, खामेनी यांच्या 'शहादती'च्या स्मरणार्थ इराणने ४० दिवसांचा सार्वजनिक पान २ वर

**सुमारे २,४७६ सदस्यांचा सहभाग | ३७.५ टन कचरा गोळा**

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



रेवदंडा येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे रविवारी (दि.१) स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वीरीत्या स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी ३७.५ टन कचरा गोळा करण्यात आला. या अभियानामध्ये सुमारे २,४७६ सदस्य सहभागी होते.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडामार्फत सातत्याने सामाजउपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने वृक्ष लागवड आणि संवर्धन, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, दाखले वाटप, शैक्षणीक साहित्य वाटप, अंध व मुखबधीर विद्यार्थांना मदत, उद्योजकता व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीर, जनजागृती शिबीर, पाणपोई, आपतग्रस्तंना मदत यासारखे अनेक उपक्रम राबविले जातात. गेल्या काही वर्षांपासून प्रतिष्ठानमार्फत स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्यांच्या या महान कार्याची पंतप्रधान नरेंद मोदी यांनी दखल घेत त्यांनी ज्येष्ठ निरुपणकार डॉ. आप्पासाहेब तथा दत्तात्रेय धर्माधिकारी यांची स्वच्छतादूत म्हणून निवड केली आहे.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडामार्फत रविवारी राबविण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानात ३२.३० किलोमीटर लांब रस्ते, तसेच १६७८७.०६ चौरस मीटर सरकारी कार्यालये, रुग्णालये व ५ किलोमीटर समुद्र किनारा स्वच्छ करण्यात आला. या स्वच्छता अभियानात २,४७६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. या अभियानातून एकूण ३७.५ टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला. त्यांनतर जमा केलेला कचरा डंपिंग ग्राऊंड पर्यंत नेण्यात आला.

# ९८ कोटींच्या अर्थसंकल्पाला मंजुरी

**सभेला भाजपच्या सदस्यांची दांडी**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण नगरपरिषदेच्या सत्ताधारी मविआने अंदाजित अर्थसंकल्पाच्या मंजुरीसाठी बोलाविलेली विशेष सभा नुकतीच पार पडली. मात्र, या विशेष सभेकडे भाजपच्या १२ सदस्यांनीही पाठ फिरविली. कोरमअभावी अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाली नाही. मात्र, विशेष अधिकाराचा वापर करून २०२६-२७ या वर्षातील ९८ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर करून अंतिम मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी दिली.

उरण नगरपरिषदेचा अंदाजित अर्थसंकल्प २८ फेब्रुवारीपर्यंत मंजूर करून घेण्याचे आदेश शासनाने दिले होते. या आदेशानुसार नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी शुक्रवारी (दि.२७) स्थायी समिती व विशेष सभा बोलावली होती. मात्र, विशेष अर्थसंकल्पाच्या सभेआधीच मुख्याधिकारी समीर जाधव हे मंगळवारपासून (दि.२४) रजेवर गेले आहेत. त्यांच्याजागी अन्य मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनीही मुख्याधिकारीपदाचा तात्पुरता भार नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र घाडगे यांच्याकडे सोपविला आहे. दरम्यान, शुक्रवारी नगराध्यक्षांनी बोलाविलेल्या स्थायी समिती व विशेष सभा या दोन्ही बैठकांसाठी भाजपचे १२ सदस्यही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे सभागृहात कोरमअभावी २०२६-२७ या वर्षातील ९८ कोटींच्या अर्थसंकल्पाची विशेष सभा तहकूब करण्यात आली असल्याची माहिती नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र घाडगे यांनी दिली. तर, स्थायी समिती व विशेष सभेत अर्थसंकल्पाच्या मंजूरीची पुर्णपणे जबाबदारी नगराध्यक्षांचीच आहे. त्यामुळे भाजप सदस्यांच्या स्थायी समिती, उपस्थिती, गैरउपस्थितीचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी प्रतिक्रिया भाजपचे उपनगराध्यक्ष रवि भोईर यांनी दिली. त्यामुळे विशेष अधिकाराचा वापर करून अर्थसंकल्प सभागृहात मंजूर करून घेण्यात आला. तसेच, हा अर्थसंकल्प अंतिम मंजुरीसाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी दिली.

# भ्रष्टाचाराची चौकशी, कारवाई शून्य!



**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रुप ग्रामपंचायतीत १५व्या वित्त आयोगाच्या निधीत कोट्यवधींचा अपहार झाल्याचा गंभीर संशय व्यक्त होत असताना प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. चौकशी होऊन चार महिने उलटले, प्रत्यक्ष स्थळपाहणीही झाली; तरी अंतिम अहवाल गुप्तच ठेवला गेला आहे. कारवाईचा ठोस मागमूस नाही. पारदर्शकतेचा बुरखा फाटल्याची चर्चा गावागावांत रंगली आहे.

माहिती अधिकारातून उघड अनियमिततेचे धागे २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांतील १५व्या वित्त आयोगाच्या विकासकामांबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते प्रतिक प्रमोद कणगी (ताराबंदर, बोर्लीमांडला) यांनी मागविलेल्या कागदपत्रांत धक्कादायक बाबी समोर आल्या. अनेक कामांसाठी जीएसटी बिले, कार्यादेश, काम पूर्णत्व प्रमाणपत्रे आणि जिओ-टॅगिंगचे पुरावे उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. काही कामे प्रत्यक्षात झालेली नसताना कागदोपत्री पूर्ण दाखविणे, तर जुन्या कामांना नव्याने दाखवून निधी खर्च दाखविण्याचा संशय व्यक्त झाला. यामुळे 'निधीचा डोलारा' उभा करून खोट्या कामांचा खेळ रचल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

मुरूड पंचायत समिती येथे गतवर्षी १६ ऑक्टोबर रोजी लेखी तक्रार दाखल झाली. पाठपुराव्यानंतर दि.१ जानेवारी रोजी चौकशी अधिकारी नियुक्त करून स्थळपाहणी करण्यात आली. चौकशीदरम्यान काही कामे अपूर्ण/अस्तित्वात नसल्याची नोंद झाल्याची माहिती समोर येते; तरी चार महिने उलटूनही अंतिम अहवाल जाहीर नाही. दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय, आर्थिक किंवा फौजदारी कारवाई शून्ययामुळे प्रशासनाची निष्ठा संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत राज विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अहवाल दाबून ठेवल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. पारदर्शकतेच्या घोषणा करणाऱ्या यंत्रणेचे हे मौन अधिकच बोचरे ठरत आहे. प्रतिक कणगी यांनी प्रशासनावर कठोर शब्दांत टीका करताना म्हटले की, माहिती अधिकारातून उघड झालेल्या अनियमिततेची अधिकृत चौकशी झाली; परंतु कारवाई नाही. त्यामुळे ही जनतेची फसवणूक आहे. सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. तात्काळ अहवाल जाहीर करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली आहे. त्यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, राज्य ग्रामविकास व पंचायत राज सचिव डॉ. एकनाथ डवले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः हस्तक्षेप करून चौकशीची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# आला उन्हाळा, विद्यार्थ्यांनो तब्येत सांभाळा!

## उन्हाळी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर तज्ज्ञांचा सल्ला

## पालकांनीही घ्यावी विशेष खबरदारी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

फेब्रुवारी-मार्च महिन्यात वाढणारे तापमान आणि त्याच काळात येणाऱ्या शालेय वार्षिक परीक्षा यामुळे विद्यार्थ्यांवर दुहेरी ताण निर्माण होत आहे. एका बाजूला कडक उन्हामुळे शारीरिक थकवा, डोकेदुखी, निर्जलीकरण (डिहायड्रेशन) यांसारख्या तक्रारी वाढत आहेत, तर दुसऱ्या बाजूला अभ्यासाचा व निकालाचा मानसिक ताणही जाणवत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आपल्या पाल्याची आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत अत्यावश्यक ठरते.

उष्माघाताचा धोका वाढण्याची शक्यता न करता येत नाही त्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, दुपारच्या सत्रात परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना उष्माघाताचा धोका अधिक असतो. पुरेसे पाणी न पिणे, उपाशीपोटी घराबाहेर पडणे किंवा जड, तेलकट आहार घेणे यामुळे अशक्तपणा जाणवू शकतो. त्यामुळे परीक्षा काळात हलका, पचायला सोपा आणि पौष्टिक आहार विद्यार्थ्यांनी परीक्षा काळात घ्यावा. यासाठी आहारात सकाळी नाश्त्यात फळे, दूध, ताक किंवा लिंबूपाणी घ्यावे. कलिंगड, खरबूज, काकडी यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे आहारात समाविष्ट करावीत. जंक फूड, कोल्ड ड्रिंक्स व अति तिखट पदार्थ टाळावेत. परीक्षा केंद्रावर पाण्याची बाटली घेऊन जाण्याची परवानगी असल्यास सोबत ठेवणे गरजेचे आहे.

### पालकांची भूमिका महत्त्वाची

परीक्षेच्या काळात पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचा ताण टाकू नये. सकारात्मक वातावरण, प्रोत्साहन व भावनिक आधार देणे अधिक उपयुक्त ठरते. निकालापेक्षा प्रयत्नांना दाद देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संबंधित शाळांनीही काळजी घेणे गरजेचे आहे. अनेक शाळांनी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व पंख्यांची योग्य व्यवस्था केली आहे. काही ठिकाणी आरोग्य जनजागृतीसाठी सूचना फलकही लावण्यात आले आहेत. दुपारच्या तीव्र उन्हात परीक्षा असल्यास विद्यार्थ्यांना वेळेआधी केंद्रावर पोहोचण्याचा सल्ला देण्यात येत आहे. उन्हाळ्याचे वाढते चटके आणि परीक्षेचा ताण या दोन्हींचा समतोल राखत विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेतली, तर यश नक्कीच गाठता येईल. 'आरोग्य चांगले, तरच निकाल उज्ज्वल' हे सूत्र लक्षात ठेवूनच या परीक्षा पर्वाला सामोरे जाण्याची गरज आहे.

# माझी वसुंधरा अभियानात वडगाव ग्रामपंचायत प्रथम

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील ग्रुप ग्रामपंचायत वडगाव यांच्या प्रशासनाने लोकनियुक्त प्रतिनिधी नसतानादेखील ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेऊन उत्कृष्ट काम केले. त्यामुळे त्यांनी 'माझी वसुंधरा अभियान ५.०' हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रथम क्रमांकाने पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते स्वीकारला. याप्रसंगी महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत हे उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ५ ते १० हजार लोकसंख्या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये वडगाव ग्रामपंचायतीचा राज्यात प्रथम क्रमांक आला. विशेष म्हणजे, येथे लोकनियुक्त सदस्य नाहीत, ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे व ग्रामपंचायत प्रशासक विनोद चांदोरकर यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेऊन माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

# कचरा जाळल्याने विद्यूत वाहिनीचे नुकसान

## ■ महावितरणकडून उपाययोजनांची मागणी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील काही भागांत रस्त्याच्या कडेला अथवा मोकळ्या जागेत कचरा पेटवला जातो. बऱ्याच ठिकाणी कचरा पेटवण्याच्या जागेवरून विद्यूत वाहीन्या गेलेल्या आहेत. त्यामुळे सातत्याने त्या ठिकाणी कचरा जाळल्याने वीज वाहिन्या व विद्यूत पोल जळण्याच्या घटना घडत आहेत. परिणामी नागरिकांना वारंवार अंधारात रहावे लागत आहे.

येथील कारंजखोल तसेच रस्त्याच्या कडेला अथवा मोकळ्या जागेत कचरा पेटवला जातो. काही ठिकाणी तर सर्विस रोडला लागूनच कचरा जाळल्याने त्याची झळ तिथे असलेल्या विद्यु खांबावरील



विद्यूत वाहीनीला देखील लागत आहे. त्यामुळे ही वाहीनी वितळून वीजपुरवठा खंडीत होतो. त्यामुळे घरगुती तसेच व्यावसायिक कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून महावितरण विभागाने तात्काळ ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

वारंवार केबल जळाल्याने दुरुस्तीवर खर्च वाढत असून महत्त्वाची यंत्रणा धोक्यात येत आहे. काही ठिकाणी भूमिगत केबलऐवजी उघड्या वायर असल्याने धोका अधिक वाढतो. यावर उपाय म्हणून ग्रामपंचायतीने कचरा जाळण्यास सक्त मनाई करून दंडात्मक कारवाई करावी, नियमित कचरा संकलन व्यवस्था मजबूत करावी तसेच महावितरणने संवेदनशील भागात केबल संरक्षक कव्हर बसवावेत. तसेच, ज्या ठिकाणी विद्यूत वाहिनी उघडी दिसत असेल अशा ठिकाणी वाहिनीवर सिमेंट टाकून ती सुरक्षित करावी, अशी मागणी होत आहे. तसेच, ग्रामपंचायत आणि वीज वितरण कंपनीने संयुक्त पथक तयार करून जनजागृती मोहीम राबवावी, अशीही सूचना नागरिकांनी केली आहे.

प्रशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत तर भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# संदीप भोसले यांची निरीक्षकपदी नियुक्ती

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून संदीप भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तेमूळ सातारा जिल्हा येथील असून त्यांनी आपले संपूर्ण शिक्षण तेथेच पूर्ण केले आहे. घरात कोणतीही पोलीस परंपरा नसतानाही स्वतःच्या जिद्दी, मेहनत आणि कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी पोलीस दलात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

भोसले यांना सुमारे २० वर्षांचा प्रदीर्घ पोलीस सेवेचा अनुभव आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी नक्षल प्रभावित गडचिरोली जिल्ह्यात दीड वर्ष कार्य केले. कठीण आणि आव्हानात्मक परिस्थितीत काम करताना त्यांनी धाडस, संयम आणि नियोजनक्षमतेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. त्यानंतर त्यांनी पुणे ग्रामीण, नाशिक, नंदुरबार, नागपूर, सिंधुदुर्ग तसेच कर्जत (जि. रायगड) येथे विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. गुन्हे अन्वेषण, कायदा व सुव्यवस्था राखणे, विशेष मोहिमा राबविणे तसेच सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. महाड शहरात रुजू



झाल्यानंतर त्यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले. आगामी शिवजयंती, होळी, चवदार तळे सत्याग्रह दिन तसेच इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून योग्य नियोजन केले जाईल, असे त्यांनी सांगितले. महाड शहरात एका अनुभवी आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# महाडमधील एम्बायो कंपनीत आग

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसी येथील एम्बायो कंपनीत आग लागल्याची घटना घडली. औषधी उपयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या अमली पदार्थांचे उत्पादन सुरू असताना रासायनिक प्रक्रियेदरम्यान अचानक प्रेशर निर्माण झाले. यामुळे छोटा स्फोट होऊन आगीला सुरुवात झाली. घटनेची माहिती मिळताच कंपनीच्या अंतर्गत अग्नीशमन दलाने तात्काळ कार्यवाही करत आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झालेली नाही.


# म्हसळ्यात गोहत्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

## पोलिसांच्या कारवाईने परिसरात खळबळ

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात गोवंश चोरी व कत्तल प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने धडक कारवाई करत दोन संशयितांना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील तपास सुरू आहे.

म्हसळा पोलीस ठाण्यात दि. २६ फेब्रुवारी रोजी गोहत्यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली. सुरई येथील रहिवासी परशुराम धोंडू जाधव यांच्या दोन बैलांची चोरी झाल्याची माहिती समोर आली होती. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी नवानगर, म्हसळा येथे छापा टाकला असता चोरीस गेलेले बैल कत्तलीच्या उद्देशाने आणल्याचे आढळून आले. या कारवाईदरम्यान आरोपी आफताफ हुरजूक व त्याचा साथीदार इमरान काझी यांच्या राहत्या घरी एक बैल बांधलेल्या अवस्थेत जिवंत आढळला, तर दुसऱ्या बैलाची कत्तल झाल्याचे पोलिसांनी सांगितले. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे



यांनी पथकासह ही कारवाई करून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे व तपासी अंमलदार एस.पी. रोहिणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणामागे मोठी टोळी कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात असून, संबंधित साखळीचा तपास केला जात आहे.

**पान १ वरून**

## गेल कंपनीत कामगाराचा मृत्यू

एजन्सीकडून सांगण्यात आले. एसकेबी एजन्सी मार्फत मिळालेल्या माहितीनुसार, उसर येथील गेल कंपनीत काम सुरू आहे. वेगवेगळ्या एजन्सी द्वारे काम केले जात आहे. एसकेबी सिव्हील टेक प्रोजेक्ट लि. या एजन्सीद्वारे कंपनीत शुक्रवारी (दि.२७) सायंकाळी श्रीराम भगत हा कामगार हेल्पर म्हणून काम करत होता. त्याला अचानक हृदय विकाराचा झटका आला. त्याला अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. परंतु, त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. मात्र, मृताच्या नातेवाईकांनी मृतदेह घेण्यास नकार दिला. कंपनीतील एजन्सीने फक्त भरपाई म्हणून १ लाख रुपये देण्याचा प्रयत्न केला. परंतु, मृताच्या नातेवाईकांनी तुटपुंज्या भरपाईचा तीव्र विरोध केला. मुबलक प्रमाणात भरपाई द्यावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली. अखेर एजन्सीने नमते घेत ५ लाख भरपाई देण्याचे ठरल्यानंतर नातेवाईकांनी रविवारी (दि.१) मृतदेह ताब्यात घेतला, अशी माहिती एजन्सीचे रणजीत कुमार आणि निमेश सिंग यांनी दिली.

## रोहा तालुक्यात सापडला पाचवा किल्ला

या शोध मोहीम संकल्पनेमध्ये आनंद सानप, शोध मोहिम सहकारी कृष्णराम जाधव, किशोर सावरकर, सौरभ घरट, केतन फुलपगारे, दत्तात्रेय सावंत आदींसह गड, दुर्ग व इतिहासप्रेमी मावळ्यांनी परिश्रम घेतले.

## लाखोंची फसवणूक करणारा गजाआड

आधारे तो दमण येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पनवेल पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने संजय कदम याला ताब्यात घेतले. तसेच, फसवणुक करून अपहार केलेले फोटोग्राफीचे काही साहित्य हस्तगत करण्यात आले. तसेच, त्यातील काही साहित्य मुंबई येथील एका कॅमेरा दुकानात विकल्याचे सांगितल्याने त्यांच्याकडुन देखील विकलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## रस्ते बांधणीत मोठा भ्रष्टाचार

बांधणी कामाच्या चौकशी करून ठेकेदार आणि सबंधित अधिकाऱ्यांवर करण्यात यावी. त्याबाबत महानगरपालिका क्षेत्रातील करदात्या जनतेच्या माहिती करीता खुलासा करावा, अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांनी पनवेल महानगर पालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे केली आहे. यावेळी पनवेल शिवसेना संघटक दीपक निकम, शिवसेनेचे नवीन पनवेल शहर प्रमुख यतिन देशमुख, शिवसेना शहर प्रमुख प्रवीण जाधव उपस्थित होते.

## २०१३चा भूसंपादन कायदा लागू करण्याची मागणी

गेले असतांना २०१३चा कायदा लागू करण्याचे आदेश दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर विरार-अलिबाग कॉरिडॉर बाधीत शेतकऱ्यांनी हा कायदा लागू करण्याची मागणी सरकारकडे केली असल्याची माहिती शेतकरी समितीचे सचिव रविंद्र कासुकर यांनी दिली आहे. तर, तिसऱ्या मुंबईतील बाधीत शेतकऱ्यांना येथील विकासात सहभागी करून स्थानिक भूमीपुत्रांच्या पुढील पिढ्यांना या विकासाचा लाभ मिळावा या करिता सरकार आणि एमएमआरडीएने फसव्या साडेबावीस टक्के योजने ऐवजी २०१३ च्या भूसंपादन कायदा लागू करावा यासाठी शासनाकडे आपली बाजू मांडणार असल्याचे येथील शेतकरी शहाजी पाटील यांनी दिली आहे.

## अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यात खामेनींचा मृत्यू

शोक आणि सात दिवसांच्या सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. इराणच्या धर्माधिष्ठित (थिओक्रॅटिक) व्यवस्थेत सर्वोच्च नेता हे देशातील सर्वात प्रभावशाली पद आहे. राष्ट्रपती, संसद आणि न्यायपालिका यांच्याही वर त्याचे स्थान असते. खामेनी यांच्याकडे सशस्त्र दलांचे सर्वोच्च नियंत्रण होते. न्यायव्यवस्थेचे प्रमुख, राज्य नियंत्रित माध्यमांचे प्रमुख तसेच महत्त्वाच्या सुरक्षा संस्थांचे प्रमुख नेमण्याचा अधिकार त्यांच्याकडे होता. निवडून आलेल्या अधिकाऱ्यांना पदच्युत करणे, संसदेकडून मंजूर केलेले कायदे रोखणे किंवा बदलणे, तसेच युद्ध किंवा शांततेची घोषणा करणे यांसारखे निर्णायक अधिकार त्यांच्या हातात होते. त्यांचे नियंत्रण परराष्ट्र आणि लष्करी धोरणांपर्यंत विस्तारलेले होते. इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कोअर आणि त्याची परदेशी कारवाया पाहणारी कुद्स फोर्स यांच्या माध्यमातून इराणच्या प्रादेशिक धोरणांवर त्यांचा प्रभाव राहिला.

# कोलमांडला येथे कांदळवन पुनर्स्थापना सुरू

## फ्लोटिंग जेटीच्या एनओसीवर प्रश्नचिन्ह

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील कोलमांडला (ताराबंदर) परिसरात अनधिकृत भराव व कांदळवन नुकसानीच्या प्रकरणानंतर शासनाच्या पुढाकाराने कांदळवन पुनर्लागवडीचे काम सुरू झाले आहे. मात्र, संबंधित फ्लोटिंग जेटीसाठी दिलेला ना हरकत दाखला (एनओसी) अद्याप कायम असल्याने ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

ताराबंदर खाडीत झालेल्या



अनधिकृत भरावामुळे कांदळवन क्षेत्राचे नुकसान झाल्याची बाब शासकीय पाहणी अहवालात नमूद झाल्यानंतर फेब्रुवारी २०२६ पासून पुनर्स्थापना प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वयंसेवी संस्थेमार्फत कांदळवन पुनर्लागवड केली जात असून, संबंधित विभागांकडून देखरेख केली जात आहे. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हे काम हाती घेण्यात आल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) यांनी दिलेल्या फ्लोटिंग जेटीच्या एनओसीतील अटींचे उल्लंघन झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. विभागीय परवानग्या, मोजमाप, मासेमारीस अडथळा व पर्यावरणीय परिणाम यांसंदर्भातील अटींचे पालन झाले नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. परवानगी विशिष्ट गट क्रमांकांपुरती मर्यादित असताना इतर ठिकाणीही अतिक्रमण झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

आरटीआयद्वारे प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांच्या मोजमाप अहवालाची माहिती मागवण्यात आली असून, ती उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात येत आहे. ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे सचिव प्रतिक प्रमोद कणगी यांनी एमएमबीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन एनओसी तात्काळ रद्द करावी, चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# 'विज्ञान जगण्यासाठी' एकदिवसीय कार्यशाळा

**। चिरनेर । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्था संचलित वीर वाजेकर महाविद्यालयाच्या महालण विभाग, फुंडे येथे 'विज्ञान जगण्यासाठी : कांदळवन जैवविविधता व वन्यजीव संवर्धन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस वन विभाग उरण, मॅन्ग्रोव्ह फाऊंडेशन, अलिबाग तसेच राऊंड फॉरेस्ट कांदळवन यांच्या सहकार्य लाभले.

कार्यशाळेच्या प्रारंभी विज्ञान संघटना, नवोपक्रम व उद्यमसंवर्धन कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने नोबेल पुरस्कार विजेत्या शास्त्रज्ञांवरील भित्तीपत्रक सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सुधीर घरत तसेच उरण येथील राऊंड फॉरेस्ट ऑफिसर किशोर सोनावणे यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे प्रास्ताविक विज्ञान संघटनेचे प्रमुख डॉ. अनिल पालवे यांनी केले. राष्ट्रीय विज्ञान दिनाचा मुख्य उद्देश विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे व संशोधनाला चालना देणे हा आहे, असे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. उद्‌घाटक म्हणून सुधीर घरत (सदस्य, सर्वसाधारण सभा, रयत शिक्षण संस्था, सातारा) उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून किशोर सोनावणे (परिक्षेत्र वन अधिकारी, उरण) तसेच सायेश्वरी पडवळ (संशोधन सहकारी, मॅन्ग्रोव्ह फाऊंडेशन, अलिबाग) उपस्थित होते.

उद्‌घाटनपर भाषणात श्री. घरत यांनी विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व स्पष्ट केले. येणाऱ्या पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पर्यावरण, कांदळवन व जैवविविधतेचे संवर्धन अत्यावश्यक असल्याचे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे सांगितले. परिक्षेत्र वन अधिकारी श्री. सोनावणे यांनी कांदळवन संवर्धनासाठी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच कांदळवनाची सद्यस्थिती व त्याचे पर्यावरणीय फायदे याविषयी माहितीपट दाखविण्यात आला.

संशोधन सहकारी सायेश्वरी पडवळ यांनी कांदळवनांचे महत्त्व, त्यातील प्रदूषणाची समस्या, जैवविविधता व अन्नसाखळीवरील परिणाम तसेच मानवावर होणारे दुष्परिणाम याविषयी सखोल माहिती दिली. याशिवाय ऑलिव्ह रिडले कासव प्रजातीच्या संवर्धनाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. आमोद ठक्कर यांनी परिसरातील पूर्वीची समृद्ध जैवविविधता व सध्याच्या वेगवान विकासामुळे बिघडणारा पर्यावरणीय समतोल यावर भाष्य केले. पर्यावरण व कांदळवन संवर्धनासाठी शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, विद्यार्थी व युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी कांदळवन संवर्धनाची प्रतिज्ञा घेतली. आभार प्रदर्शन डॉ. राहुल पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. श्रेया पाटील व कु. अक्षदा महांकाळ यांनी केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे. मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं/ गट.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| वालक्या काथोड पालकर | १९ | २ | ०-१५-४०<br>०-०२-०<br>०-१७-४० | ११.५० |
| | ३५ | ० | ०-०१-००<br>०-०२-००<br>०-०३-०० | ०.६ |
| | ७६ | ४ | ०-०५-१०<br>०-०१-५०<br>०-०६-६० | ०.१२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु. साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-

दिनांक :- ०१/०३/२०२६

**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल,
जि. रायगड. ४१०२०६. मो. ९८३३३०६३६१.

## निवडक




### उरणमध्ये १५७७ सदस्यांचा सहभाग

**उरण :** महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिनाप्रित्यर्थ उरण शहर व परिसरात डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मभूषण डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.१) मार्च रोजी सकाळी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १५७७ श्री सदस्यांनी सहभाग घेतला. या स्वच्छता मोहिमेत ओला कचरा-१३.९ टन, सुका कचरा-१९.७५१ टन गोळा करण्यात आला. स्वच्छते विषयी समाजात, जनतेत जनजागृती व्हावी, आपले शहर स्वच्छ सुंदर व निरोगी राहावे या अनुषंगाने उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मभूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी स्वच्छता अभियानाचे आयोजन केले जाते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राबविलेल्या स्वच्छता अभियानाला जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. या मोहिमेत उरणच्या नगराध्यक्ष भावना घाणेकर यांनी सहभागी होऊन स्वच्छता अभियानात भाग घेतला.



### रेवदंड्यात स्वच्छता अभियान यशस्वी

**रेवदंडा :** डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा तर्फे ग्रामपंचायत हद्दीत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त (दि.१)मार्च नियोजनबद्ध स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पद्मश्री दत्तात्रेय आप्पासाहेब धर्माधिकारी आणि महाराष्ट्र भूषण डॉ. सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांनुसार व्यसनमुक्ती आणि परस्पर आदर हीच खरी जीवनसिद्धी. रेवदंड्यातील स्वच्छता अभियानासारखे उपक्रम गावाला निरोगी बनवतात. गावातील प्रमुख रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत आळ्या, नाले आणि झुडपे असलेल्या भागांची शिस्तबद्ध स्वच्छता करण्यात आली. स्वयंसेवकांनी पथके तयार करून प्लास्टिक, साचलेली घाण, रस्त्याकडील कचरा आणि नाल्यांतील अडथळे दूर केले.यशाची आकडेवारीअभियाना दरम्यान तब्बल २०.३ टन कचरा गोळा करून योग्य विल्हेवाट लावण्यात आली. एकूण १०९७ सदस्यांनी श्रमदान केले, ज्यात स्थानिक ग्रामस्थांचाही उत्स्फूर्त सहभाग होता. डॉ. नानासाहेब यांच्या विचारांना अभिवादन म्हणून हा उपक्रम झाला, ज्याने एकता, शिस्त आणि आदराची भावना वाढली. पर्यावरण संतुलन आणि आरोग्यासाठी उत्तम उदाहरण आहे.




### तळ्यात ५.१८ टन कचरा गोळा

**तळा :** ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त तळा येथे श्री सदस्यांकडून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानामध्ये तळा शहरातील प्रमुख रस्त्यांवरील दुतर्फा वाढलेले गवत, झुडपे, कचरा, काचेच्या व प्लास्टिकच्या बाटल्या उचलून स्वच्छता करण्यात आली. यांसह पोलीस ठाणे परिसराची देखील स्वच्छता करण्यात आली. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात यामध्ये वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप, रक्तदान आरोग्य शिबीर आदी उपक्रम एक सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय काम म्हणून राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून तळा शहरात देखील स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत ओला व सुका मिळून ५.१८ टन कचरा गोळा करून त्याची डम्पिंग ग्राउंड येथे विल्हेवाट लावण्यात आली. याप्रसंगी तालुक्यातील श्रीसदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मुरुड शहराचे रस्ते झाले चकाचक

**मुरुड जंजिरा :** महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दी निमित्ये महास्वछता अभियान संपूर्ण भारत करण्यात आले. मुरुड शहरात पोलीस उपनिरीक्षक बळीराम धोंडिबा केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक मुरुड अर्चना पांडुरंग मोगरे, नायब तहसीलदार कल्याण शंकरराव देऊळगावकर यांच्या उपस्थितीत स्वछता मोहीम सुरु करण्यात आली, मुरुड शहरात सबनीस आळी, गावदेव पाखाडी, हरिजन वाडा, दस्तुरी नाका, लक्ष्मीनारायण मंदिर, गणेश आळी, मुरुड कोळीवाडा येथील मुरुड शहराच्या रस्त्याच्या दुतरफा वाढलेली झाडी व रस्तावर आडव्या येणाऱ्या फांद्या कापून रास्ता स्वच्छ व अपघात मुक्त केला. यासाठी मुरुडतालुक्यातील ५१३ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला व ओला कचरा २.५ टॅन, व सुखा कचरा १.५ टॅन गोळा करून डम्पिंग ग्राउंड टाकण्यात आले. आपासाहेबांच्या मार्गदर्शनाखाल मुरुड शहराचे सर्व रस्ते ५१३ श्रीसदस्यांनी जुडपे कापून स्वछता मोहीम राबून चकाचक केले. तालुक्यातून गोळा झालेला २.५ टॅन ओला कचरा व १.५ टॅन सुका कचरा डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात आला.

# जिल्ह्यात श्रीसदस्यांचे महास्वच्छता अभियान



● महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांचेवतीने महास्वच्छता अभियान रविवारी (१ मार्च) राबविण्यात आले. यावेळी हजारो श्रीसदस्य प्रत्येक गाव, खेड्यात व शहरात ठिकठिकाणी जाऊन स्वच्छता करताना पाहायला मिळाले. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था

**| माथेरान | प्रतिनिधी |**

प्राणी मित्र भाविन ठक्कर, संजय कोळी, प्रतीक ठक्कर,संदीप कदम आदी मित्रानी शंभर पाण्याचे टब प्राण्यांसाठी माथेरान बाजार पेठ व संपूर्ण जंगलात ठेवण्यास सुरवात केली आहे.



उन्हाळ्यात वन्य प्राणी पाण्यासाठी भटकत असतात त्यांच्यासाठी या तरुणांचा स्तुत्य उपक्रम आहे बाजारपेठेत कुत्रे, घोडे मोठ्या प्रमाणात आहेत तर माथेरानच्या जंगलात मोठ्या प्रमाणात वन्य प्राणी आहेत. माथेरान येथे अनेक पाण्याचे झरे आहेत ते पुनर्जिवीत करणार असल्याचे भाविन ठक्कर यांनी सांगितले. माथेरानच्या अनेक प्राणी मित्रांकडून आर्थिक मदत मिळाल्याने हा उपक्रम शक्य झाल्याचे कोळी यांनी सांगितले.

## कर्जत तालुका झाला कचरामुक्त

**| नेरळ | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तालुक्यात असलेल्या मोठ्या गावात तालुक्यातील सर्व श्री सदस्य रस्त्यावर उतरले होते. तालुक्यातील किमान ४००० श्रीसदस्य रस्त्यावर आल्यानंतर रविवार (दि.१) मार्च रोजी कर्जत तालुका चकाचक दिसून आला.



डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त देशभरात स्वच्छता अभियान पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी तसेच रायगड भूषण सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

स्वच्छता हा समाजसेवेचा महत्त्वाचा भाग मानून गेल्या अनेक वर्षांपासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जात आहेत. विशेषतः 'गाव स्वच्छता अभियान' हा उपक्रम गेल्या सात वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर राबवला जात आहे. कर्जत तालुक्यात एकूण ३४ बैठकींमधून हजारो श्रीसदस्य या अभियानात सहभागी झाले होते.

श्री बैठक गुढवण, श्री बैठक पाथरज, श्री बैठक वारे, श्री बैठक चाफेवाडी, श्रीबैठक कोळीवली या सर्व बैठकीमधून या स्वच्छता अभियानासाठी श्रीसदस्य लाभले होते.

स्वच्छता मोहिमेत कशेळे येथील ग्रामीण रुग्णालय कशेळे, जिल्हा परिषद शाळा, स्मशानभूमी, हनुमान मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर, कशेळे मार्केट आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आले. ग्रामीण रुग्णालय कशेळे येथील कर्मचारी वर्गाकडून या स्वच्छता अभियान उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## रसायनीत दासभक्तांकडून स्वच्छतेचा संदेश

**| रसायनी | प्रतिनिधी |**

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्म दिनी स्वच्छता मोहीम राबवून रविवारी (दि.१) मार्च रोजी संपूर्ण रसायनी परिसर स्वच्छ करण्यात आला. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या मार्फत प्रतिष्ठानचे डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी, सचिन धर्माधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहीम आयोजित केली होती.

डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्ताने ग्रामस्वच्छता अभियान हाती घेण्यात आला होता. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा हद्दीतील स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील रस्ता, रसायनी पोस्ट ऑफिस, मोहोपाडा तळाठी कार्यालय, जनता विद्यालय शाळेचा कॉर्नर, पराडे कॉर्नर,



मोहोपाडा प्राथमिक आरोग्य केंद्र, राजिप मराठी शाळा मोहोपाडा तसेच रसायनी पोलीस स्टेशन आदी परिसरात स्वच्छता करण्यात आली.यावेळी शेकडो दासभक्त हातात विला, पंजा, झाडू, कोयता, गोणी, फावडे, प्लास्टिक शिट घेऊन हातात ग्लोज, मास्क लावून स्वच्छता साहित्य हातात घेऊन रसायनी परिसराची स्वच्छता करत असल्याचे दिसून आले. यावेळी श्रीसमर्थ दासभक्तांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

## पालीत महास्वच्छता अभियान

**| पाली/सुधागड | प्रतिनिधी |**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगड भूषण सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पालीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता अभियानात बल्लाळेश्वर मंदिर परिसर, शासकीय कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, बसस्थानक, तहसील कार्यालय, दिवाणी न्यायालय, पोलीस स्टेशन, भूमी अभिलेख कार्यालय व गोडावून परिसर, कृषी खाते व वन विभाग, बांधकाम विभाग व शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, पाली बाजारपेठ,



श्री स्वामीसमर्थ नगर आणि एस टी स्टॅण्ड परिसर, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाली स्मशानभूमी रस्ता, आयटीआय व टेभी वसाहत, हटाळेश्वर चौक परिसर व शरफुद्दीन बाबा दर्गा परिसरात श्रीसदस्यांनी स्वच्छता केली. सकाळी ८ वाजल्यापासून स्वच्छता अभियानाला सुरुवात केली. या अभियानात ८३० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. १७ हजार ८२७.५ चौ. मी परिसर आणि रस्ते ६.४ किमी स्वच्छता करून हे अभियान यशस्वी केले. या वेळी पालीतुन सुका कचरा २८.५ टन आणि ओला कचरा १३.२ टन जमा करून ट्रॅक्टर, टेम्पो यांच्या माध्यमातून डंपिंग मैदानात साठविण्यात आला.

## रानमेव्यामुळे सणासुदीत आर्थिक दिलासा

**तळा :** रायगड जिल्ह्यातील जंगल परिसरात रानमेवा उपलब्ध होऊ लागल्याने आदिवासी भगिनींना उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. सध्या काजू, हिरवी करवंदे, आंब्याच्या कैऱ्या, रानबोर, शेवग्याच्या शेंगा तसेच ओले काजूगर मोठ्या प्रमाणात तयार झाले असून हा रानमेवा बाजारात विक्रीसाठी येऊ लागला आहे. आदिवासी भगिनी पहाटेपासून जंगलात जाऊन हा नैसर्गिक मेवा गोळा करतात आणि दुसऱ्या दिवशी स्थानिक बाजारात विक्रीसाठी आणतात. दिवसभराच्या मेहनतीनंतर त्यांच्या हातात चार पैसे मिळू लागल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे.

## म्हसळ्यात शेकडो हात एकवटले


**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यात डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्म दिनी स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण म्हसळा शहर आज स्वच्छ केले आहे त्याचे संपूर्ण नियोजन डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या मार्फत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, सचिनदादा धर्माधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहीम आयोजित केली होती. डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्ताने हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या मोहिमेमध्ये म्हसळा तालुक्यातील म्हसळा पंचायत समिती परिसर म्हसळा तहसील कार्यालय,




ग्रामीण रुग्णालय म्हसळा परिसर, म्हसळा पोलीस ठाणे परिसर, म्हसळा दिघीरोड, पाभरे फाटा म्हसळा रोड स्वच्छता करण्यात आली. ही स्वच्छता करण्यासाठी प्रतिष्ठानचे सदस्य आज सकाळी ८ वाजल्यापासून स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली. या मोहीमेत अनिकेत पानसरे, रविंद्र पारखे, समिर बनकर, महादेव पाटील व पदाअधिकारी उपस्थित होते. ४ डंपर १ कचरा गाड्या४ उपलब्ध करून योग्य नियोजन केले होते.

## धर्माधिकारी प्रतिष्ठानचे कौतुक



**| माणगाव | प्रतिनिधी |**

ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने माणगाव शहरात या स्वच्छता अभियानामध्ये १४७० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. माणगावमधील तहसिल कार्यालय परिसर, प्रांत कार्यालय, पोलीस स्टेशन, कचेरी रोड, बाजारपेठ, मुंबई गोवा हायवे, निजामपूर रोड, उपजिल्हा रुग्णालय, मोर्बा रोड, जिल्हापरिषद शाळा, बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसर, महाराण प्रताप नगर रस्ता, पंचायत समिती, स्मशान भूमी आणि मच्छी मार्केट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीसदस्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून परिसर स्वच्छ केला. तसेच गटारामधील ओला कचरा सुद्धा स्वच्छ करण्यात आले. यासाठी एकूण १८ वाहनांचा वापर करुन १९.१८० टन सुका आणि ९.१०० टन ओला असा एकूण २८.२८० टन कचरा उचलण्यात आला.



माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे, ज्ञानदेव पवार, संदीप खरंगटे, नितीन बामगुडे, नितीन वाढवळ, सुरेश वाढवळ, मारुती चिनके अतुल जाधव, प्रमोद मोरे, दिनेश पाचाडकर तसेच इतर संघटनांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

ग्रुपग्रामपंचायत गोरेगाव हद्दीत ५३० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानामध्ये ग्रुप ग्रामपंचायत गोरेगावचे प्रांगण, गोरेगाव पोलीस स्टेशनचा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, गोरेगाव बस स्थानक, विष्णू तलाव गोरेगाव, गाव तलाव गोरेगाव, रायगड जिल्हा परिषद उर्दू शाळा, रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा, ए. के. आय. हायस्कूल, बौध्द विहार, मस्जिद आणि स्मशानभूमीतील परिसर स्वच्छता करण्यात आली. यासाठी एकूण १६ वाहनांचा वापर करुन १.१३० टन सुका आणि ०.७०० टन ओला असा एकूण १.८३० टन कचरा उचलण्यात आला. यावेळी डॉ. विनोद गोरेगावकर, दिनेश हरवंडकर, सुभाष बामणोलकर, अनंत चेरफळे व इतर मान्यवर उपस्थित होते. माणगांव नगरपंचायत व ग्रामपंचायत गोरेगांव महास्वच्छता अभियान यशस्वी करण्याकरिता एकूण २००० श्रीसदस्य सहभागी झाले होते. एकूण दोन्ही मिळून २०.३१० टन सुका कचरा व ९.८०० टन ओला कचरा उचलण्यात आला. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले.

## कोलाडमध्ये श्रीसदस्य एकवटले



**| कोलाड | प्रतिनिधी |**

डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे रविवारी (दि.१) मार्च रोजी सकाळी ठीक आठ वाजल्यापासून महास्वच्छता अभियान संपूर्ण कोलाड परिसरात राबविण्यात आला. या महास्वछता अभियानात ६०० ते ७०० श्रीसदस्य सहभागी झाले होते. यावेळी कोलाड परिसरातील कोलाड हायस्कूल रोड, गोदी नदीवरील ब्रिज, कोलाड-रोहा रोड,आंबेवाडी बाजारपेठे, पाले ब्रु. स्टॉप, कोलाड पोलीस ठाणे, प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी, श्री बैठक हॉल पुई अशा विविध ठिकाणावरील ओला कचरा ६ टन व सुका कचरा ५ टन असा एकूण ११ टन कचरा श्री सदस्यांच्या सहभागाने संकलित करण्यात आला.

## श्रीसदस्यांचे सरसावले हात

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्यांने व जेष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी पुर्ती सोहळा निमित्ताने, सरकारी हॉस्पिटल रस्ते, रेल्वे स्टेशन, सरकारी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, मराठी शाळा, पोस्ट ऑफीस, या सर्वच ठिकाणी असलेले आले. यावेळी हा परिसर



स्वच्छ करण्यासाठी हजारो श्री सदस्यांनी हातात झाडू घमेले, फावडे खुरपणे घेवून स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले होते. सकाळी ७:३० वाजता स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. यावेळी ओला कचरा, सुका कचरा यांचे वर्गीकरण करण्यांत आले. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानद्वारे विविध सामाजिक कार्य राबविण्यात असतांना समाजाला स्वच्छतेचे महत्व जाणून घेता यावे या उद्देशाने एक पाऊल पुढे टाकत हा उपक्रम हाती घेण्यात आले.

## स्वच्छ-सुंदर माझे गाव राखण्यासाठी अभियान

**| पनवेल | प्रतिनिधी |**

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या प्रेरणेने व डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिनदादा धर्माधिकारी मार्गदर्शनाखाली १ मार्च रोजी पनवेल तालुक्यातील नेरे, चेरीवली, वाकडी, रिटघर, दूंदरे, सुकापूर आणि कुडेवहाळ या गावांमध्ये व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या उपक्रमात तब्बल १५३४ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेत एकूण ९७५० चौ. मी. परिसर स्वच्छ केला. शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलीस चौकी तसेच स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. मोहिमेदरम्यान सुमारे १९८३० किलो कचरा गोळा करण्यात आला. संबंधित गावांचे सरपंच,उपसरपंच, ग्रामसेवक पोलीस पाटील, डॉक्टर आणि स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# भीषण धटिंगणशाही

इराणवरचा हल्ला व त्याचे सर्वोच्च नेते खामेनी यांना ठार मारणे हा डोनाल्ड ट्रम्प नावाच्या धटिंगणाच्या कारनाम्यांचे भीषण उदाहरण आहे. इस्रायलचे बेन्यामिन नेतान्याहू हे या धटिंगणाचे दोस्त कम हस्तक. या दोघांनी मिळून इराणची ताकद नष्ट करण्याचे कारस्थान पूर्वीपासूनच आखले होते. गेल्या वर्षी कोणतेही कारण नसताना इस्रायलने इराणच्या अणुभट्ट्यांवर हल्ले केले होते. आतादेखील इराणवर हल्ला करण्यासाठी कोणतेही सबळ कारण हे दोघे देऊ शकलेले नाहीत. इराणमध्ये अयातुल्ला खामेनींची हुकुमशाही होती व त्याने जनता त्रस्त होती, सबब आम्ही हल्ला केला असे ट्रम्प आता सांगत आहेत. पण तो शुद्ध बकवास आहे. तसे पाहायला गेल्यास ट्रम्प आणि नेतान्याहू यांचीही आपापल्या देशात अशीच हुकुमशाही सध्या चालू आहे. याचे निमित्त करून रशिया किंवा चीन यांनी या देशांवर हल्ला केला व या दोन नेत्यांना हाकलले तर गहजब होईल. लोकशाहीवर हल्ला म्हणून सगळे देश गळा काढतील. खामेनी हे लोकशाही रीतीने निवडून आलेले नव्हते व ट्रम्प व नेतान्याहू तसे आलेले आहेत एवढाच त्यांच्यातला फरक आहे. पण बाकी अनेक बाबतीत खामेनींपेक्षाही अधिक वाईट अशी त्यांची जुलुमशाही चालू आहे. ट्रम्प यांनी आयातशुल्काच्या नावाखाली सगळ्या जगाला वेठीला धरले आहे. या आयातशुल्काला तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवूनही ट्रम्प यांची मनमानी थांबलेली नाही. उलट वाढलेलीच आहे. दुसरीकडे नेतान्याहू यांनी गाझा पट्टीत नरसंहाराचा कहर करूनही जगातील कोणीही देश त्यांना काहीही करू शकलेले नाहीत. त्यामुळे त्यांची मस्ती वाढली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कायदा, न्याय, नीती यांना काहीही किंमत राहिलेली नसून ट्रम्प किंवा नेतान्याहू यांच्यासारखे गुंड नेते वाट्टेल तसा धुमाकूळ घालत आहेत. गेल्या वर्षीच्या हल्ल्यानंतर इराणमधील अण्वस्त्रे तयार करण्याची क्षमता पूर्ण नष्ट ट्रम्प यांनी जाहीर केले होते. म्हणजेच इराणकडून आता पूर्वीसारखा धोका राहिलेला नव्हता. तरीही ट्रम्प हे इराणला इशारे देत होते. इराणच्या आसपासच्या आखातात अमेरिकेने आपल्या सैन्याची, विशेषतः नौदलाची तैनाती केली होती. हे सगळे नेपथ्याचा भाग होते. प्रत्यक्ष हल्ला इस्रायलने करायचा आणि अमेरिकेने त्यांना रसद पुरवायची असे हे संयुक्त कटकारस्थान होते.

## ट्रम्पच्या हुकुमशाहीचे काय?

खामेनींच्या राजवटीत महिलांवर अधिक निर्बंध लादण्यात आले. पण तसेच किंवा त्याहून अधिक कडक बंधने सौदी अरेबियामध्ये आहेत. इराणमध्ये मुलींना बुरखा घ्यावा लागतो. पण तेथे मुलींमधील शिक्षणाचे प्रमाण चांगले आहे. अनेक डॉक्टर तसेच शास्त्रज्ञ या मुली आहेत. शिवाय तेथे या बायका अधूनमधून आंदोलनेही करीत असतात. सौदी अरेबियात असे काही करायला परवानगी नाही. केले तर त्या बायकांना थेट देहदंडाची शिक्षा आहे. पण असे असूनही सौदी हा ट्रम्पांचा मित्र. त्यांच्या जावई हा सौदीच्या शेखांचा अनेक कंपन्यातला भागीदार. याउलट इराणवर मात्र अमेरिकेची कायम वाकडी नजर. याचे कारण हेच आहे की, इराण हा पूर्वापार अमेरिकेचे बंधन न मानणारा स्वतंत्र देश आहे. तेलाच्या खाणींमुळे पूर्वी त्याच्याकडे भरपूर समृध्दी होती व त्याच्या जिवावर त्याने स्वतःची संरक्षणसिध्दताही वाढवली होती. त्याला रशियाकडून भरपूर मदत होती. पण ट्रम्प यांनी इराणवर आर्थिक निर्बंध लादल्याने त्याचे तेल खरेदी करणे इतर देशांना अशक्य झाले. चीन इराणकडून अजूनही तेल घेतो. पण इराणलाच नव्हे तर कोणत्याही मित्र देशाला अडचणीच्या काळात मदत करणे चीन कधीही करत नाही. याबाबतीत तो अमेरिकेशी थेट पंगा घेणे टाळतो. याहीवेळी बहुदा तसेच होईल. गेल्या वर्षीच्या हल्ल्यांनंतर इराणची अर्थव्यवस्था मोडकळीला आली होती. महागाई प्रचंड वाढली होती. खामेनींना नेहमी पाठिंबा देणाऱ्या शिया व्यापाऱ्यांनाही आंदोलने केली होती. जनतेत कमालीची अस्वस्थता होती. पण याचे निमित्त करून ट्रम्प किंवा अन्य कोणीही बाहेरून त्या देशावर हल्ला करणे हे लोकशाही मूल्यांचा गळा घोटणारे आहे. तसे पाहायला गेले तर फ्रान्स व इंग्लंडमध्येही सत्ताधारी नेत्यांविरुध्द प्रचंड नाराजी आहे. या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्था बिकट अवस्थेत आहेत. पण त्यांच्यावर हल्ला करून विरोधकांकडे सत्ता सोपवावी असा विचार ट्रम्प करू शकत नाहीत. इंग्लंड तर सोडाच, आपला शेजारी पाकिस्तानच्या बाबतही ट्रम्प हे करू धजावणार नाहीत. यापूर्वी अफगाणिस्तानमधून तर तोंड लपवून अमेरिकी लष्कराला काढता पाय घ्यावा लागला होता.

## भारताची गुळमुळीत भूमिका

सारांश, इराणवरचा हल्ला कोणत्याही स्थितीत क्षम्य ठरू शकत नाही. भारताने खरे तर याचा कडक शब्दात निषेध करायला हवा. पण आपण नेहमीप्रमाणे अत्यंत गुळमुळीत भाषा वापरली आहे. वास्तविक इराण हा आपला जुना मित्र आहे.त्याच्याकडून आपण अनेक वर्षे स्वस्तात तेल खरेदी केले आहे. शिवाय याचे पेमेंट डॉलरमध्ये न करता रुपयाच्या चलनात करण्याची सूट इराणने कायमच आपल्याला दिली होती. तरीही आपण अशा मित्राची मैत्री निभावू शकत नाही ही बाब लाजिरवाणी आहे. मोदी हे स्वतःला विश्वगुरु म्हणवतात. त्यातला पोकळपणा या हल्ल्यांच्या निमित्ताने उघड झाला आहे. युक्रेनच्या संदर्भात सध्याचे युग हे युध्दांचे नाही असे मोदींनी म्हटले होते. त्यावेळी त्यांनी जणू पुतीनलाच ते बजावले आहे अशा रीतीने भक्त मंडळी नाचत होती. आता हेच वाक्य ट्रम्प आणि नेतान्याहू यांना ऐकवण्याची धमक मोदींमध्ये आहे काय? इराणमध्ये कोणाचे व कसे राज्य असावे हा निर्णय त्या देशातील जनतेने घ्यायचा आहे अशी स्पष्ट भूमिका भारताने खरे तर घ्यायला हवी. पण मोदी तर आताच इस्रायलला जाऊन आले व तेथील संसदेपुढे भारत व इस्रायलच्या मैत्रीचे गोडवे गावून आले. त्यामुळे त्यांच्याचाने ते होणार नाही. आता खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणमध्ये निर्नायकी होण्याची शक्यता आहे. इराणचे अनेक सैन्याधिकारी तसेच गुप्तचर अधिकाऱ्यांना यापूर्वीही इस्रायलने मारले होते. एकीकडे शांतता प्रस्तावावर इराणचे मंत्री जीनिव्हामध्ये युरोप व अमेरिकेशी चर्चा करीत असताना हे हत्याकांड घडवले गेले होते. आतादेखील ओमानचे सत्ताधीश इराणसोबतच्या वाटाघाटींसाठी अमेरिकेच्या वतीने पुढाकार घेण्याची मुलाखत देत असतानाच तिकडे इस्रायलने हल्ला केला. इराणच्या लोकांचा खामेनी यांना विरोध होता. पण अमेरिकेने त्यांना या रीतीने मारणे हे कोणालाही आवडणारे नाही. त्यामुळे आता याची संतप्त प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे. इराणने दुबई, कतार, सौदी अरेबियात हल्ले चढवले आहेत. होमुझच्या सामुद्रधुनीतील जहाजांची ये-जा बंद करून टाकली आहे. थोडक्यात यामुळे आधीच मंदीचा दणका सहन करणाऱ्या जगभरातील देशांची आणखी वाट लागणार आहे. युध्द थांबवल्याचा दावा करून नोबेल पारितोषिकांवर हक्क सांगणाऱ्या ट्रम्प नावाच्या भांडवली माफियाने आपल्या हेकेखोरपणाने आखातालाच नव्हे तर सर्व जगालाच युध्दाच्या खाईत लोटले आहे.

विचार

# मानसिक आरोग्य समस्येत पालकांची भूमिका

आजच्या आधुनिक युगात, मानव जितके प्रगत समजतात तितकेच, ते स्वतःला समस्यांनी वेढलेले आढळत आहेत, विशेषतः मानसिक आरोग्य समस्यांनी. सर्व वयोगटातील लोकांना कधी ना कधी मानसिक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते किंवा तोंड द्यावे लागले असेल. आयुष्यात आनंद, सुख-समाधान आणि शांती फक्त नावापुरतीच असल्याचे दिसते. असे वाटते की प्रत्येकजण स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगत आहे. अगदी किशोरवयीन मुलांमध्येही आजकाल, मानसिक आरोग्य समस्यांचा प्रश्न खूप गंभीर पातळीवर पोहोचला आहे. किशोरवयीन मुलांमध्ये सातत्याने वाढणारे गुन्हेगारीचे प्रमाण ही देखील एक गंभीर समस्या आहे. या वयातील मुलांमध्ये राग, चिडचिडेपणा, ताणतणाव, द्वेष, सहनशीलतेचा अभाव, सोशल मीडियाचे व्यसन आणि अंमली पदार्थांचे सेवन यासारख्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. किशोरवयीन मुलांनी केलेल्या घटना आणि कृतींबद्दल जाणून घेतल्यावर आपल्याला अनेकदा धक्का बसतो. पालकांनी त्यांना फक्त फटकारले तर ते आत्महत्या किंवा स्वतःला हानी पोहोचवणे, घरातून पळून जाणे किंवा अनुचित पावले उचलणे आणि गंभीर गुन्हे करण्यासाठी मोठ्या गुन्हेगारांसारख्या टोळ्या तयार करणे असे गुन्हे करतात. किशोरवयीन मुले चोरी, दरोडा, तस्करी, बलात्कार, खून आणि खून करण्याचा प्रयत्न यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याच्या घटना देखील सातत्याने घडत असतात. शाळकरी मुलांद्वारे त्यांच्या शिक्षकांवरही हल्ला करण्याच्या घटना सुद्धा अनेकदा नोंदवल्या जातात. लहान वयात गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंड असण्याचा ट्रेंड, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग, ड्रग्जचे व्यसन, खोटा देखावा, खोटे बोलणे, संस्कारांचा अभाव, नैतिकतेचा अभाव, चारित्र्याचा अभाव आणि अश्लीलता यांनी समाजाला विषारी बनवले आहे. अनेक तरुणांनी लोकांना आकर्षित करण्यासाठी सर्व सीमा ओलांडून निर्लज्जपणाचे कळस गाठून आपले जीवन उद्ध्वस्त केले आहे.

दुसरीकडे, पालकांचा मुलांवर नियंत्रणाचा अभाव, मुलांवर आंधळा विश्वास, वाईट संगत, मुले आयुष्यातील वाईट गोष्टी किंवा घडत असलेल्या घटनांना विरोध करण्यास घाबरतात, काही भीतीच्या सावलीत जगतात, पालकांनी मुलांना वेळ न देणे, संगोपनाचे सकारात्मक वातावरण निर्माण न करून देणे, मुलांकडून पालकांनी जास्त अपेक्षा ठेवणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, मुलांवर दबाव आणणे किंवा आपल्या इच्छा त्यांच्यावर लादणे आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या भावना समजून घेण्यास असमर्थता ही देखील आजकाल किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण करणारी कारणे आहेत. किशोरवयीन मुलांमध्ये वाढत्या मानसिक आरोग्य समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ मार्च



रोजी ''जागतिक किशोर मानसिक आरोग्य दिन'' साजरा केला जातो. हा दिवस जागरूकता वाढवणे, कलंक कमी करणे, चिंता, ताण आणि नैराश्यासारख्या किशोरवयीन आरोग्य आव्हानांबद्दल खुल्या संभाषणांना प्रोत्साहन देणे तसेच स्वतःची काळजी घेण्याच्या धोरणांवर लक्ष केंद्रित करणे यावर भर दिला जातो. २०२६ ची थीम ''किशोरवयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांमध्ये निरोगी आणि कल्याणकारी उपक्रमांचे नेतृत्व करण्यास सक्षम करणे'' आहे.

**डॉ. प्रीतम गेडाम**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, किशोरवयीन मुले शारीरिक, भावनिक आणि सामाजिक बदलांमुळे मानसिक आरोग्य समस्यांना बळी पडतात, ज्यात गरिबी, गैरवापर किंवा हिंसाचार यांचा समावेश आहे. त्यांना या समस्यांपासून वाचवणे आणि चांगल्या जीवनासाठी आवश्यक असलेले आल्हाददायक संगोपनाचे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असा अंदाज आहे की, जगभरात, १०-१९ वयोगटातील सातपैकी एका मुलाला मानसिक आरोग्य समस्या आहे. हे सर्व जागतिक आजारांपैकी १५ टक्के आहे, तरीही या समस्या मोठ्या प्रमाणात ओळखल्या जात नाहीत आणि त्यांच्यावर उपचार केले जात नाहीत. आयुष्यभर होणाऱ्या मानसिक आजारांपैकी अर्धे आजार वयाच्या १४ व्या वर्षी सुरू होतात. मानसिक आरोग्य समस्या असलेल्या मुलांना सामाजिक बहिष्कार, भेदभाव, कलंक, शैक्षणिक अडचणी, जोखीम पत्करण्याचे वर्तन, शारीरिक आजार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा सामना करावा लागतो. वर्तणुकीशी संबंधित मानसिक विकार हे मोठ्या वयाच्या किशोरवयीन मुलांपेक्षा तरुण किशोरवयीन मुलांमध्ये अधिक सामान्य आहेत. नैराश्य, चिंता आणि वर्तणुकीशी संबंधित विकार हे किशोरवयीन मुलांमध्ये आजार आणि अपंगत्वाची प्रमुख कारणे आहेत. १५-२९ वयोगटातील मुलांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. आवश्यक आरोग्यसेवेची उपलब्धता नसल्याने, मुले मोठी होताना समाजात आणि कुटुंबात योग्य स्थान मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे जीवनात अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागते. अटेंशन डेफिसिट हाइपरएक्टिविटी डिसऑर्डर, अतिक्रियाशीलता विकार आणि वर्तणुकीशी संबंधित विकार किशोरवयीन मुलांच्या शिक्षणावर परिणाम करू शकतात आणि गुन्हेगारी वर्तनाचा धोका वाढवू शकतात, जो संपूर्ण मानवी समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

आजच्या किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्यांसाठी पालक हे सर्वात मोठे दोषी आहेत. मुले ही पालकांची जबाबदारी आहेत आणि पालक हे विसरतात. केवळ मुलांचे लाड करून किंवा त्यांच्या मागण्या पूर्ण करून जबाबदाऱ्या पूर्ण होत नाहीत. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या आवश्यक गरजा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलांना काय हवे आहे आणि ते कशाचा आग्रह धरतात यातील फरक समजून घेणे महत्वाचे. पालक अनेकदा म्हणतात की ते त्यांच्या मुलांसाठी पैसे कमवण्यात व्यस्त आहेत. पण पैशाने जगातील प्रत्येक गरज खरेदी करता येत नाही किंवा पूर्ण करता येत नाही. मुलांना योग्य वेळी आधार देणे महत्वाचे आहे, त्यांच्यासोबत मित्र म्हणून वेळ घालवणे देखील महत्वाचे आहे. फक्त आपली मुले आहेत म्हणून त्यांच्या चुका झाकणे किंवा ते हट्टी आहेत म्हणून त्यांच्या बेकायदेशीर मागण्या पूर्ण करणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. आज आपण जगभरात आणि समाजात जे गुन्हेगार पाहतो, कदाचित जर त्यांच्या पालकांनी त्यांना योग्य वेळी चांगले संगोपन, मूल्ये आणि पोषक वातावरण दिले असते, तर ते आज समाजासाठी एक भयंकर त्रास बनले नसते. दररोज निरोगी झोप घेणे, नियमित व्यायाम करणे, शारीरिक आणि मानसिक चेतना वाढविणारे खेळ खेळणे, समस्या सोडविण्यासाठी परस्पर कौशल्ये विकसित करणे आणि भावनांचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकणे आवश्यक आहे. घर, कुटुंब, शाळा आणि व्यापक समुदायामध्ये संरक्षणात्मक आणि आल्हाददायक सहाय्यक वातावरण अत्यंत महत्वाचे आहे.

अभ्यासात असे आढळून आले की शाळकरी मुलांपैकी २३.३३ टक्के मुलांना मानसिक आरोग्य समस्या आहेत. अभ्यासाचा ताण, सोशल मीडियाचा अति वापर आणि कुटुंबातील बिघाड यामुळे ताणतणाव वाढतो, यातील ४३ टक्के विद्यार्थ्यांनी मूड स्विंगची तक्रार केली तर ११ टक्के विद्यार्थ्यांनी चिंता संदर्भात समस्या व्यक्त केली. १० टक्क्यांपेक्षा कमी तरुण भारतीयांना औपचारिक मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. बहुतेक किशोरवयीन मुले मानसिक आरोग्य विकारांसाठी मदत घेण्यास कचरतात. सायबरबुलिंग, सामाजिक तुलना आणि इंटरनेट व्यसन वाढत आहे आणि १५-१९ वयोगटातील मुलांमध्ये अल्कोहोलचा वापर जास्त आहे. १३-१७ वयोगटातील अंदाजे ७ टक्के किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्य विकार आहेत आणि तरुणांमध्ये आत्महत्या हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे. पालकांनी त्यांच्या मुलांसोबत वेळ घालवणे महत्वाचे आहे जेणेकरून त्यांना भावनिकदृष्ट्या बळकटी मिळेल आणि मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होईल. शारीरिक हालचाली आणि मानसिक आरोग्य यांच्यात सकारात्मक संबंध आहे. खेळांमुळे ताण कमी होतो. म्हणून, पालकांनी आपल्या मुलांना सायकलिंग, स्केटिंग, पोहणे, हायकिंग किंवा इतर कोणत्याही बाह्य खेळासाठी बाहेर घेऊन जावे.

मुलांना स्वयंसेवक म्हणून सामाजिक कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे, जेवण आणि नाश्ता एकत्र करणे, दिवसाच्या क्रियाकलापांवर चर्चा करणे, व्यायाम आणि योगाचे महत्त्व समजावून सांगणे, चांगले छंद जोपासायला शिकवणे, चांगले मूल्ये रुजवणे, लोकांमधील भेदभाव दुर्लक्षित करून सगळीकडे मानवतेचा संदेश पसरवणे आणि निसर्ग व राष्ट्रसेवेला प्राधान्य देणे ह्या गोष्टी मुलांमध्ये रुजविण्याची प्राथमिक कर्तव्ये पालक आणि शिक्षकांची आहेत. मुलांच्या कलागुणांना किंवा कमतरतांकडे कधीही दुर्लक्ष करू नका; त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन देणे महत्वाचे आहे. अशा प्रकारे, मुले शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत होतील आणि वाईट सवयींपासून दूर राहतील, ज्यामुळे मानसिक आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता टाळता येईल.

# होळी म्हणजे नव्या सकारात्मकतेचा जन्म

फाल्गुन पौर्णिमा अवतरली की गावोगावी होळ्या उभ्या राहतात. जिल्हाभरात आज (दि.२) होळी सण मोठ्या उत्सवात साजरा होणार आहे. यंदा जिल्ह्यात सुमारे ५,०६० ठिकाणी होळ्या उभारल्या जाणार आहेत. त्यांची विधिवत पुजा करून त्यांचे दहन केले जाणार आहे. या होळ्या केवळ लाकडांचा अग्नी नव्हे, तर समाजमनातील आशा-अपेक्षांचा दिवा आहे. तसेच, हा केवळ रंगाचा सण नसून तो अन्याय, अहंकार आणि द्वेष यांच्या राखेतून नव्या सकारात्मकतेचा जन्म घडवणारा उत्सव आहे. तसेच, या सणामागे एक पौराणीक कथा आहे. त्या कथेतून मानवाने चांगली शिकवण घेण्याची गरज आहे.



होळी हा सण हिंदू संस्कृतील महत्त्वाच्या सणापैकी एक सण आहे. या दिवशी सुपारी, केळी किंवा इतर वनस्पतीचे झाड जमीनीत उभे करून त्याची पुजा केली जाते. त्यानंतर रात्रीच्या सुमारास त्या भोवती सुकलेले ओंडके, फांद्या व नारळाच्या सुकलेल्या झावळ्या रचल्या जातात. त्यानंतर गावातील प्रमुख मंडळी नारळाची झावळी पेटवून त्या होळी भोवती गोल फेरी मारतात. त्यानंतर होळी पेटवली जाते. होळीने पुर्णपणे पेट घेतला की त्यात नारळ टाकले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात होळीत टाकलेले नारळ उघड्या हाताने काढण्याच्या स्पर्धा लागयच्या. मात्र, आता काठीच्या सहाय्याने बाहेर काढले जातात. त्यानंतर भाजलेल्या नारळांचा प्रसाद केला जातो. काही ठिकाणी होळी परंपरेनुसार वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.

खरतर होळी हा सण मुख्य होळीच्या दहा-बारा दिवसांपूर्वीच सुरू होतो. या वेळी सर्व लहान मोठे एकत्र येऊन छोट्या होळ्या जाळतात. काही ठिकाणी आल्पोपहारचे आयोजन देखील केले जाते. यानिमित्ताने अखंड गाव एकत्र येतो. तसेच, या दिवसांत आट्या पाट्या खेळ खेळला जातो. परंतु, काळाच्या ओघात आणि मोबाईलच्या दुनियेत हा खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. ज्या ठिकाणी दहा-बारा दिवस मुलांचा गोगांट असायचा त्या ठिकाणी आता शुकशुकाट पसरलेला असतो. तर, काही ठिकाणी शेवटची मोठी होळीच जेमतेम लावली जात आहे.

तसेच, होळी सणामागे एक पौराणिक कथा आहे. भक्त प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू यांची. हिरण्यकश्यपू आपल्या मुलाचे म्हणजेच भक्त प्रल्हादाचे अस्तित्व मिटविण्यासाठी आपली बहीण होलिका हीची मदत घेतो. होलिका भक्त प्रल्हादला मांडीवर बसून सारणावर बसते आणि पेट घेते. प्रचंड ज्वालेतही भक्त प्रल्हाद विष्णू भक्तीत रमलेला असतो. त्यामुळे त्याच्या केसालाही धक्का लागत नाही. उलट होलिकाने पेटवलेल्या आगीत ती स्वतःच पेट घेते आणि जिवाला मुकते. त्यांची ही कथा आजही तेवढीच समर्पक वाटते. सत्तेच्या अहंकाराने अंध झालेल्या वृत्तीचा अंत आणि श्रद्धा, सत्य व निष्ठेचा विजय होलिका दहनातून याच संदेशाची पुनरावृत्ती होते. समाजात वाढणाऱ्या कटुतेच्या, वैचारिक दरीच्या आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, असत्य कितीही बलाढ्य असले तरी त्याचा अंत अटळ आहे, असे होळी आपल्याला सांगते. तेव्हापासून तिच्या नावने होळी पेटवली जाते.

**संतोष राऊळ**

परंतु, होळी या सणादरम्यान मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जाते. शहरी भागात झाडांची संख्या जेमतेम राहिली असून वृक्षतोड पर्यावरणासाठी धोकादायक ठरत आहे. त्यामुळे होळीच्या पार्श्वभूमीवर अवैध वृक्षतोडीच्या प्रमाणात देखील वाढ होत आहे. त्यामुळे होळीसाठी केळी सारख्या झाडांचा आणि सुकलेली लाकडे तसेच नारळाच्या झावळ्यांचा वापर करण्याचा सल्ला दिला जात आहे.

होलिका दहनानंतर दुसऱ्यादिवशी म्हणजे उद्या (दि.३) धुळवड साजरी केली जाणार आहे. ही धुळवड म्हणजे आनंदाची मुक्त उधळण होय. यावेळी प्रत्येक जण एकमेकांवर रंग उधळतो. यावेळी गालावर लावलेला गुलाल केवळ रंग नसतो; तर तो मैत्रीचा, बंधुभावाचा आणि समतेचा स्पर्श असतो. जाती-धर्म, श्रीमंत-गरीब, लहान-मोठा या सर्व सीमारेषा त्या दिवशी धूसर होतात. रंगपंचमीच्या दिवशी तरुणाई ढोल-ताशांच्या गजरात रंगांच्या वर्षावात न्हाऊन निघते आणि वातावरणात उत्साहाची लय निर्माण होते. परंतु, बदलत्या काळात सण साजरा करण्याची पद्धतही बदलत आहे. रासायनिक रंगांचा अतिरेक, पाण्याची उधळपट्टी आणि होलिका दहनासाठी होणारी झाडांची तोड ही चिंतेची बाब ठरत आहे. सणाचा आनंद घेताना पर्यावरणाचे भान राखणे ही काळाची गरज आहे. नैसर्गिक रंगांचा वापर, पाण्याची बचत आणि साध्या पद्धतीने होळी साजरी करणे हीच खरी सामाजिक जबाबदारी ठरेल, असे जबाबदार नागरिकांमधून बोलले जात आहे.

होळी आपल्याला अन्याय, अहंकार आणि द्वेष यांच्या राखेतून नव्या सकारात्मकतेचा जन्म घडवते. तसेच, धुलवड व रंगपंचमी केवळ रंगांची नव्हे, तर विचारांचीही उधळण करण्याचे आवाहन करते. त्यामुळे मनातील मत्सर, राग आणि अहंकार जाळून टाकून प्रेम, मैत्री आणि सलोखा यांचे रंग उधळले, तरच सणाचा खरा अर्थ जपला जाईल, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

दिनविशेष

# होळी रे होळी पुरणाची पोळी!

शेवटचा मराठी महिना फाल्गुन आणि या महिन्यातील पौर्णिमेला येणारा सण म्हणजे म होळी .फ देशभरात विविध ठिकाणी हा सण साजरी करण्याची परंपरा, पद्धत वेगळी. पण तितकीच खास आणि आकर्षक आहे. पहिल्या दिवशी होलिका दहन होते आणि दुसऱ्या दिवशी एकमेकांवर रंग उडवून रंगांची होळी खेळली जाते ज्याला धुलिवंदन असे म्हटले जाते. होळीला शिमगाही म्हटले जाते. भगवान शंकराची लीला, याला शिव-शिमगासुद्धा म्हटले जाते.

दृष्ट प्रवृत्ती, वाईट, अमंगल विचार यांचा नाश करुन चांगली वृत्ती, चांगले विचार अंगी बाळगावे, हा या सणामागील उद्देश. होळीनिमित्त पुरळपोळी, रंग, धुडवड या सगळ्याचे आकर्षण तर असतेच.

जसे प्रत्येक सणाची कहाणी आहे तसेच, होळी साजरी करण्या मागे देखील एक प्राचीन इतिहास आहे. हिरण्यकश्यपू नावाचा एक राजा होता जो स्वतःला खूप बलवान समजायचा. स्वतःच्या अहंकारामुळे तो देवतांची घृणा करायचा तसेच त्याला देवांचा देव भगवान विष्णूचे नाव ऐकणे देखील पसंत नव्हते. परंतु त्याचा पुत्र प्रल्हाद हा भगवान विष्णूचा परम भक्त होता. आणि हे हिरण्यकश्यपूला अजिबात पसंत नव्हते. तो वेगवेगळ्या प्रकारे त्याला घाबरवण्याचा प्रयत्न करत असे जेणे करून पुत्र प्रह्लाद भगवान विष्णूची उपासना करणे सोडून देईल. परंतु भक्त प्रह्लाद त्यांना न डगमगता त्याच्या भगवान विष्णूच्या भक्तीत लीन होत असे. ह्या सगळ्याला कंटाळून राजाने एक योजना बनवली, आणि त्यानुसार आपली बहीण होलिका जिला वरदान मिळाले होते कि ती आगीवर विजय प्राप्त करू शकते तसेच कोणतीही आग तिला जाळू शकत नाही. राजाने होलिकेला भक्त प्रह्लादला घेऊन अग्नीच्या चितेवर बसण्यास सांगितले. प्रह्लाद आपल्या आत्यासोबत अग्नीच्या चितेवर बसला व भगवान विष्णूच्या नामस्मरणात लीन झाला आणि थोड्याच वेळात होलिका जळायला लागली आणि एक आकाशवाणी झाली आणि ज्यानुसार होलिकेला आठवलं की, तिला वरदानात असेही सांगितले होते कि ज्यावेळी ती तिच्या वरदानाचा दुरुपयोग करेल तेव्हा ती स्वतः जळून राख होईल. भक्त प्रह्लादाला अग्नी काहीही करू शकला नाही मात्र होलिका त्या अग्नीत जळून भस्म झाली. अशा प्रकारे त्या दिवशी लोकांनी उत्सव साजरा केला आणि तो दिवस होळी दहन म्हणून ओळखला जाऊ लागला. दुसऱ्या दिवशी रंगाने हा सण उत्सवात साजरा करू लागले.

लोकसंसद

# अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

– श्याम ठाणेदार, पुणे

# श्रीवर्धनचा प्लास्टिकमुक्त निर्धार

## प्लास्टिक वस्तूंवर कडक बंदी; नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धनमधील वाढत्या पर्यटनासोबतच प्रदूषणदेखील वाढत आहे. शहरातील पर्यावरण संरक्षण, स्वच्छता तसेच समुद्रकिनाऱ्यांवरील वाढत्या प्लास्टिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन नगर परिषदेकडून एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंवर कडक बंदी लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शहरातील व्यापारी, विक्रेते आणि नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार देशभरात काही विशिष्ट एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंवर बंदी लागू करण्यात आली आहे. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (सुधारित) नियम आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत ही कारवाई केली जात आहे. या नियमांनुसार १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरीबॅग्ज, कप, प्लेट्स, स्ट्रॉ, कटलरी, स्टिक तसेच थर्माकोलच्या सजावटीच्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे.

श्रीवर्धन हे किनारपट्टीलगतचे पर्यटनस्थळ असल्यामुळे पर्यटन हंगामात प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. समुद्रकिनाऱ्यांवर साचणारा प्लास्टिक कचरा समुद्री जीवसृष्टीसाठी धोकादायक ठरत असून पर्यावरणीय समतोल बिघडवत आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषदेकडून ‘प्लास्टिकमुक्त श्रीवर्धन’ हा संकल्प हाती घेण्यात आला आहे. नगर परिषद प्रशासनाने व्यापाऱ्यांसाठी विशेष जनजागृती बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. कापडी व कागदी पिशव्या तसेच जैवविघटनशील पर्यायांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

### सहकार्य करण्याचे आवाहन

शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावेत. तसेच शहर स्वच्छ, सुंदर व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नगर परिषदेकडून करण्यात आले आहे.

### विशेष तपासणी पथकांची स्थापना

बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर, साठा किंवा विक्री आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. प्रथमच उल्लंघन झाल्यास दंड आकारला जाईल व माल जप्त करण्यात येईल. वारंवार नियमभंग करणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यासाठी विशेष तपासणी पथके स्थापन करण्यात आली असून शहरात नियमित पाहणी केली जाणार आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२मार्च

१) श्री.रमेश मोहनलाल कारिया
कामतआळी,अलिबाग
०२-०३-१९४४

२) श्री.भीमराव तुळशीराम लहुपाचांग
०२-०३-१९५९, चेंढरे, अलिबाग

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

---

## बाहे येथे विविध गुणदर्शन कार्यक्रम

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावामध्ये डिजिटल प्राथ. शाळा बाहे येथे शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी केंद्रप्रमुख रश्मी साळी, उपसरपंच सूरज कचरे, उद्योजक नारायण कान्हेकर, उपक्रमशील शिक्षक सुनील थिटे, अरूण आगळे, विजय वेळे, अनिल सुटे, विठ्ठल हाके, सामाजिक कार्यकर्ते संदेश गायकवाड, मुख्याध्यापिका रूची सामंत, सह शिक्षिका प्रणाली जंगम, अर्चना काळे, वेळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोशन मोरे, उपाध्यक्ष, सदस्य, सदस्या, सर्वपालक तसेच ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थी वर्गाने सादर केलेले हिंदी मराठी गीतांचे रेकॉर्ड डान्स, विविध सण समारंभ व लोकगीतांवर सादर केलेल्या नृत्यांनी उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकून वाहवा मिळवली.

---

# रुग्णालयांनी दरपत्रक प्रदर्शित करणे अनिवार्य

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे प्रतिपादन

। मुंबई। प्रतिनिधी ।

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचे दरपत्रक व रुग्णांच्या हक्कांची नोंदणी दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे. ज्या रुग्णालयांकडून हे नियम पाळले जात नाहीत, अशा रुग्णालयांवर कारवाई केली जाईल, असे आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितले.

राज्यात आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचे दरपत्रक जाहीर करण्याबाबत शंकर जगताप यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, राज्यात १ जुलै २०२४ पासून प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना एकत्रितपणे राबवली जात आहे. योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे अडीच कोटी कुटुंबांना, म्हणजेच १२ कोटी ५० लाख नागरिकांना रुपये १० लाखांपर्यंतचा मोफत आरोग्य विमा कवच देण्यात आले आहे. यापूर्वी या योजनेअंतर्गत १३६९ रोगांवर उपचार उपलब्ध होते. आता ती संख्या २२९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

---

# आदिवासी भागात दंत चिकित्सा शिबीर

। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील बोरगाव या ठिकाणी त्या परिसरातील विद्यार्थी यांची मोफत दंत चिकित्सा आणि उपचार आयकेएस फाऊंडेशन नवी मुंबई ऐरोली यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबीराचा लाभ परिसरातील अनेक विद्यार्थ्यांनी घेतला.



खालापूर तालुक्यातील बोरगाव हे माथेरान पायथ्याशी असून या दुर्गम आदिवासी भागातील शाळांमधील विद्यार्थी यांची दंत चिकित्सा व त्यावर उपचार करण्याचे महत्वपूर्ण दंत चिकित्सा शिबीर आयकेएस फाऊंडेशन नवी मुंबई ऐरोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. हा परिसर दुर्गम असून अद्यापही म्हणावे तसे दळणवळण साधन नाही, त्यामुळे येथील रुग्णांना उपचार मिळणे आवश्यक आहे. वेळेवर दळणवळण उपलब्ध होत नसल्याने अनेक रुग्ण आजार अंगावर काढताना आढळतात. याची जाणीव या परिसरात काम करणाऱ्या सामाजिक संस्था आयकेएस फाऊंडेशन नवी मुंबई यांना झाल्याने त्यांनी विद्यार्थी यांच्यासाठी दंत चिकित्सा व त्यावर उपचार शिबीर आयोजित केले. यावेळी परिसरातील सर्व शाळेचे विद्यार्थ्यांनी दंत चिकित्सा करून घेतली.

डॉ. अपूर्वा बांगर, डॉ. स्वाती मौर्या, डॉ. कीर्ती, डॉ. मोनिका भोईर, डॉ. अंशूला, डॉ. विशाल वाघमारे यांनी चिकित्सा केली. त्यांना मदतनीस म्हणून तांत्रिक शोएब यांनी सहकार्य केले. सर्व विद्यार्थी यांना नाश्ता व भोजनाची सोय करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या दंत चिकित्सानंतर पालक वर्गाने संस्थांचे आभार व्यक्त केले.

---

# राठोड विद्यालयात मराठी भाषेची पालखी

। माणगाव । प्रतिनिधी ।

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालय परिसरात मराठी भाषेचा गौरव आणि अभिमान यांचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांनी साकारलेली मराठी राजभाषा दुर्ग ही संकल्पना. या दुर्गाच्या माध्यमातून मराठी भाषेची परंपरा, इतिहास आणि समृद्ध साहित्यविश्व यांचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले. तसेच मराठीतील विविध साहित्यप्रकारांचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेख अशा विविध साहित्यप्रकारांची माहिती विद्यार्थ्यांनी सुंदर पद्धतीने मांडली. अनेक नामवंत मराठी लेखक व कवी यांची माहिती फलकांच्या माध्यमातून सादर करण्यात आली.



विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा जागर करत विविध देशभक्तीपर आणि संस्कृतीप्रधान गीतांचे सादरीकरण केले. पारंपरिक व आधुनिक नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. तसेच कविता गायन आणि काव्यवाचनातून मराठी भाषेची गोडी आणि अभिव्यक्तीची ताकद अनुभवायला मिळाली.

कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली मराठी भाषेची पालखी. लेझीम पथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण नृत्य करत पालखी मिरवणूक काढली. या मराठी भाषा दिन सोहळ्यात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी भाषेची महती वर्णन करत मराठीबद्दलचा अभिमान व्यक्त केला. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून आपली संस्कृती, परंपरा आणि ओळख असल्याचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

---

## देवकान्हेत आमालकी एकादशी साजरी

**खांब :** रोहा तालुक्यातील देवकान्हे येथे सलग १० वर्षांची यशस्वी परंपरा राखत यावर्षीही दि.२७ व दि.२८ फेब्रुवारी रोजी आमलकी एकादशी उत्सव सोहळा भक्तीभावाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी मूर्ती अभिषेक, विणापूजन व पहारा, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, रायगड भूषण डॉ. मारूती महाराज कोलाटकर यांचे प्रवचन, सामुदायिक हरिपाठ, हभप निलेश महाराज पवार, चिपळूण यांचे हरिकिर्तन नंतर सामुदायिक जागर भजन व दि.२८ रोजी पहाटे काकड आरती, नंतर महाप्रसाद आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले.

---

# झुगारेवाडी शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरेवाडी शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व समजावे, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक आणि राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते रवी काजळे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने अनेक उपक्रम राबविले. त्याबाबत सर्व शिक्षक वर्गांच्या माध्यमातून हा दिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.




कार्यक्रमाची सुरुवात भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमापूजनाने झाली. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना विज्ञान हे केवळ विषय नसून जीवनपद्धती आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राष्ट्रीय विज्ञान दिली राबवले. या निमित्ताने विज्ञान प्रदर्शन, प्रयोग सादरीकरण, पोस्टर स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा व भाषण स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सौरऊर्जा, पाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया, पर्यावरण संवर्धन, मानवी अवयव रचना, जलचक्र इत्यादी विषयांवर आकर्षक मॉडेल्स व प्रात्यक्षिके सादर केली. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला पालक वर्ग तसेच ग्रामस्थांनी उपस्थिती लावून शिक्षक वर्गाचे आणि सहभागी विद्यार्थ्यांसह कौतुक केले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी उत्सुकता वाढीस लागली असून शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांना नवे बळ मिळाले आहे.

---

## बोर्लीपंचतनच्या होळीचा अनोखा वारसा

। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतनची ग्रामदेवता चिंचबादेवीचा आठ दिवस चालणारा शिमगोत्सव पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. या उत्सवात गावात एकच मोठी होळी लावली जाते. होळी प्रज्वलित झाल्यावर होळीच्या मध्यभागी उभारलेल्या खांबाला पाडण्यासाठी लागणारी मजबूत वेल जंगलातून आणण्याची पिढीजात परंपरा बोर्ली पंचतनचं धुमाळ कुटुंब आजही जपत आहे. हरी धुमाळ यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र धोंडू व शंकर धुमाळ ही परंपरा चालवीत होते. त्यांच्या पश्चात सध्या शंकर धुमाळ यांच्यासह त्यांच्या पुढील पिढीतील योगेश, मुकेश आणि अमीश धुमाळ हे तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून



ही परंपरा जतन करत आहेत. होळी सण म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक एकोपा, सांस्कृतिक जाणीव आणि लोकपरंपरेचा उत्सव आहे. जंगलातून योग्य वेल निवडून ती तोडून डोक्यावर उचलून गावात आणणे ही संपूर्ण प्रक्रिया परंपरेचा मान राखण्यासाठी धुमाळ कुटुंब श्रद्धेने पार पाडत आहे. गावातील सर्व समाजातील तरुण मोठ्या उत्साहाने त्या वेलीच्या सहाय्याने होळीचा खांब पाडतात. ज्यातून सामाजिक ऐक्य आणि उत्सवाचा आनंद अनुभवास येतो.

---

**विविध प्रयोगांचे प्रभावीपणे सादरीकरण** **परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

# पडसरे आश्रमशाळेत अवतरले ‘छोटे सायंटिस्ट’

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा पडसरे येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन आश्रमशाळा पडसरे, शापुरजी पालोनजी आणि कं. लि (एसपीसीएल), एएफसीओएनएस इन्फ्रा. लि. ज्ञानप्रबोधिनी, पुणे आणि विज्ञान आश्रम, पाबळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

‘छोटे सायंटिस्ट’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी ध्वनी, प्रकाशाचे परावर्तन, विद्युत ऊर्जा आणि चुंबकत्व



या विषयांवरील विविध प्रयोग प्रभावीपणे सादर केले. तसेच कौशल्याधारित शिक्षण अंतर्गत गांडूळ खतनिर्मिती, हायड्रोपोनिक शेती पद्धत आणि सोलर कुकर यांसारख्या पर्यावरणपूरक व उपयुक्त प्रकल्पांचे आकर्षक प्रदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक रविंद्र लिमये, संचालिका शिल्पा लिमये, एसपीसीएल कंपनीतर्फे झरीन कमिशनराईट व शीतल अरोरा, एएफसीओएनएस कंपनीचे स्वयंसेवक, ज्ञानप्रबोधिनी पुणे येथील ओंकार बाणाईत, विज्ञान आश्रम पाबळ येथील शरद जाधव, माध्यमिक मुख्याध्यापक संदीप शिंदे, प्राथमिक मुख्याध्यापिका मीनाक्षी ढोपे, विभागाचे निदेशक, शिक्षक वर्ग, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनासाठी व कंपनीतील विविध पदांवरील अधिकारी व अभियंत्यांनी विद्यार्थ्यांना पंधरा दिवस मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले होते. राष्ट्रीय विज्ञान दिनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्वक आपले प्रयोग सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. पाठ्यपुस्तकातील विज्ञान संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे समजून घेत विद्यार्थ्यांनी आनंददायी पद्धतीने त्यांची मांडणी केली.

प्रदर्शनामध्ये प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रयोगशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कौशल्याधारित शिक्षण अंगीकारावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. या कार्यक्रमास पालक व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

# निवडक

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई :** राज्यातील कापूस खरेदीची मुदत वाढवण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. या अनुषंगाने पणन विभागाने कापूस खरेदी मुदत वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. या मागणीचा सकारात्मक विचार करून केंद्र सरकारने राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देत कापूस खरेदीसाठीची मुदत १५ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे केली. यासोबतच राज्य शासनामार्फत हरभरा खरेदी प्रक्रिया राबवली जाणार आहे. १ मार्च २०२६ पासून शेतकरी नोंदणी आणि ५८७५ रुपये प्रती क्विंटल या हमीभावाने हरभर खरेदी सुरू करण्यात येत आहे, अशी माहितीही पणन जयकुमार रावल यांनी विधानसभेत दिली.

## महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा




**तळा :** श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे दि.२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महान भारतीय शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या स्मरणार्थ हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. या निमित्ताने महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन, प्रात्यक्षिके व मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग सादर करून विज्ञानाविषयीची जिज्ञासा व आवड व्यक्त केली. यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची संकल्पना ‘विज्ञान आणि तंत्रज्ञानाद्वारे विकसित भारत’ अशी असून विज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला. यावेळी विज्ञान दिनाचे औचित्य साधून रांगोळी भित्तिपत्रके व प्रश्नमंजुषा या विषयावर स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये प्रश्नमंजुषेमध्ये प्रथम श्वेत वाघ, द्वितीय मनीष गजमल, तृतीय श्रुती आवरे तसेच रांगोळीमध्ये प्रथम संयोजता शिंदे व स्नेहा शिंदे द्वितीय रिद्धी पाटील व रिया अडसुळे तृतीय. त्याचबरोबर भितीपत्रके या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्रेया खराडे, द्वितीय संचिता जाधव, तृतीय रिया अडसुळे आणि रिद्धी पाटील यांचा सन्मान महाविद्यालयाच्या वतीने प्रमाणपत्र पुष्पगुच्छ व पेन देऊन करण्यात आला.

## बंजारा महिलांचे पारंपरिक नृत्य सादर



**नवी मुंबई :** ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित भव्य कार्यक्रमात बंजारा समाजातील महिलांनी पारंपरिक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रंगीत पारंपरिक वेशभूषा आणि आकर्षक दागिने परिधान करून सादर केलेल्या नृत्यामुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे आणि सांस्कृतिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले. विविध राज्यांतून आलेल्या भाविकांनी या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली. सादरीकरणाच्या माध्यमातून धर्म, संस्कृती आणि परंपरांचा संगम पाहायला मिळाला. बंजारा समाजाच्या महिलांनी आपल्या सादरीकरणातून एकता, बंधुता आणि सांस्कृतिक वैविध्याचा संदेश दिला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु ग्रंथ साहिब यांच्या शिकवणीनुसार समता आणि मानवतेचा विचार अधिक दृढ करण्यात आला.

## निलेश शिर्के यांना पितृशोक

**पाली :** सुधागड तालुक्यातील फोटोग्राफर निलेश शिर्के यांचे वडील व पुई-सिद्धेश्वर येथील शेतकरी बंडू देवजी शिर्के (७०) यांचे शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. बंडू शिर्के हे सत्यवचनी व स्वच्छतेची आवड असणारे व्यक्तिमत्व म्हणून विभागात परिचित होते. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांचे आई वडील सोडून गेल्यावर त्यांनी प्रचंड मेहनत करून आपला संसार उभा केला होता. बंडू शिर्के यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई व चार नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या जाण्याने शिर्के परिवार, आप्तेष्ट व मित्रपरिवार यांच्यावर शोककळा पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२ फेब्रुवारी रोजी उद्धर रामेश्वर येथे होणार आहे. तसेच, उत्तरकार्य गुरुवार दि.५ फेब्रुवारी रोजी पुई सिद्धेश्वर येथे राहत्या घरी होणार आहेत.



## वारे केंद्र शाळेत संस्कृतिक कार्यक्रम



**नेरळ :** कर्जत तालुक्यातील वारे गावात असलेल्या रायगड जिल्हा परिषदेचे केंद्र शाळेत वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ‘कलाविष्कार’ या नावाने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. वारे केंद्र शाळेचे मुख्याध्यापक मुख्याध्यापक मच्छिंद्र रढे आणि सर्व शिक्षक वर्गाने नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी केंद्र स्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. उपशिक्षक प्रदीप सैदाने, दिनकर बागुल आणि किशोर बडाख (पदवीधर शिक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांनी नृत्यकला, लोकनृत्य, आदिवासी लोकनृत्य, देशभक्तीपर गीत-नृत्य आदी विविध प्रकारातील तब्बल ३० हून अधिक सादरीकरणे सादर केली. विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा, नेटक्या हालचाली, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि विषयांची वैविध्यपूर्ण मांडणी यामुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार ठरला. विद्यार्थ्यांच्या या प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळत राहिली. तर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचे मनःपूर्वक कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास मोठी चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

# माथेरान नगरपरिषद आर्थिक संकटात?

## ।। मुख्याधिकाऱ्यांच्या कारभारावर विरोधकांचा गंभीर आरोप ।। सखोल चौकशी करण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान नगरपरिषद सध्या आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचा आरोप विरोधी पक्षाने केला आहे. प्रशासक राजवटीत काढण्यात आलेल्या विविध निविदांमुळे पालिकेची आर्थिक तिजोरी रिकामी झाली असून, शहरातील सार्वजनिक ठिकाणांचा वीजपुरवठा खंडित झाल्याची माहिती समोर येत आहे.



विरोधी पक्षातील नगरसेवक सचिन दाभेकर यांनी आरोप केला की, पालिकेची बँक खाती जवळपास शून्यावर आली आहेत. शहरातील घोडे तबेले, हुतात्मा भाई कोतवाल व्यायामशाळा तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी वीजपुरवठा बंद आहे. वीजबिल न भरल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

दाभेकर यांनी पुढे सांगितले की, मुख्याधिकाऱ्यांनी प्रशासक कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांची रायगड जिल्हाधिकारी व शासन स्तरावर चौकशी करण्यात यावी. आवश्यक नसलेल्या खर्चामुळे नगरपरिषद आर्थिक संकटात सापडल्याचा त्यांचा दावा आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन देण्यासाठीही आर्थिक तरतूद नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणली. तसेच ३८ लाख रुपये खर्चून १६ ई-शौचालये खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध होतो, मात्र वीजबिल भरण्यासाठी पैसे नसल्याचा आरोपही त्यांनी केला. गेल्या चार वर्षांत नगरपरिषदेला आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आणण्यात आल्याची टीका त्यांनी केली.

पुढील दोन दिवसांत प्रलंबित वीजबिले भरून वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास मुख्याधिकाऱ्यांविरोधात आंदोलन छेडण्याचा इशाराही विरोधी पक्षाने दिला आहे. प्रशासक काळात घेतलेल्या सर्व निर्णयांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या आरोपांमुळे माथेरान नगरपरिषदेत आर्थिक कारभाराबाबत चर्चेला उधाण आले असून, प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरणाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## 'कृषी पुरस्कारांसाठी अर्ज सादर करा'

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्यातील विविध कृषी पुरस्कारांसाठी इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था व गटांनी सन २०२५ पासूनचे प्रस्ताव संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित, कृषीभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. पूर्वी ऑफलाईन पद्धतीने चार प्रतींमध्ये प्रस्ताव स्वीकारले जात. कृषी विभागाच्या संकेतस्थळावर 'कृषी पुरस्कार' या टॅबमध्ये अर्ज उपलब्ध आहेत.

## निवडक



### सुरक्षेचा बंधारा की धोक्याचा इशारा?

**उरण :** उरण तालुक्यातील पर्यटन नकाशावर महत्त्वाचे स्थान असलेल्या नागाव समुद्रकिनाऱ्यावर उभारलेला दगडी सुरक्षा बंधारा सध्या ठिकठिकाणी ढासळलेल्या अवस्थेत असून, पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भरती-ओहोटीमुळे सैल झालेले मोठे दगड किनाऱ्यावर आणि पाण्यात विखुरलेले दिसत आहेत. त्यामुळे किनाऱ्यावर फिरणाऱ्या पर्यटकांसह सकाळी व्यायामासाठी येणाऱ्या स्थानिक नागरिकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. किनाऱ्याची धूप रोखण्यासाठी काही वर्षांपूर्वी बंदर विभागामार्फत हा दगडी बंधारा भारण्यात आला होता. प्रारंभी त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला; मात्र कालांतराने काही भाग खचल्याने दगड सैल झाले आहेत. भरतीच्या वेळी पाण्याची पातळी वाढल्यानंतर या दगडांमधून मार्ग काढताना पर्यटकांचा तोल जाण्याच्या घटना घडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. किरकोळ दुखापतींच्या काही घटना समोर आल्याचेही सांगण्यात येते.नागाव किनाऱ्यावर स्थानिकांच्या उपजीविकेसाठी लहान-मोठे स्टॉल्स, खाद्यपदार्थ विक्रेते व विविध पर्यटन सेवा उपलब्ध आहेत. मात्र, बंधाऱ्याच्या सध्याच्या स्थितीमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, पर्यटन व्यवसायावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून बंधाऱ्याची दुरुस्ती करावी, सैल दगड हटवावेत तसेच धोकादायक भागात चेतावणी फलक, दोरखंड किंवा तात्पुरते कुंपण उभारावे, अशी मागणी केली आहे. सुरक्षेसाठी उभारलेला बंधारा जर स्वतःच धोकादायक ठरत असेल, तर मोठा अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. पर्यटकांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी आता जोर धरत आहे.



### खालापूरमध्ये चोरीचे दागिने हस्तगत

**रसायनी :** पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या दागिने चोरी प्रकरणांचा जलदगतीने तपास करून सुमारे ४ लाख ३१ हजार रुपयांचे दागिने हस्तगत केले आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित मालकांना दागिने परत देण्यात आले. खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०९/२०२४ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात सुमारे चार लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण चोरीस गेले होते. तसेच गुन्हा क्रमांक १९/२०२५ अंतर्गत कलम १०३(१) नुसार आणखी एका दागिने चोरीची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणात सुमारे ३१ हजार रुपये किमतीचे दागिने चोरीस गेले होते. अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन पवार आणि त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयितांना ताब्यात घेतले व चोरीस गेलेले दागिने जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या दागिन्यांची एकूण किंमत ४ लाख ३१ हजार रुपये असून, न्यायालयाच्या आदेशानुसार ते जयश्री खंडू मालकर (रा. चौक, ता. खालापूर) आणि विठाबाई बाळू चव्हाण (ता. खालापूर) यांना परत करण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे.** वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- **सुवर्णसंधी** (WORK FROM HOME) **वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा** इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घरातून मोबाईलवरून किंवा ऑफिसमधून काम करा. Income- 12000 To 15000 Age 18+ Contact Number- 7744956912
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# खड्डेमय रस्त्यामुळे जीवघेणा प्रवास

- **रोहा मोरेआळी-हनुमान टेकडी-तांबडी मार्गाची दुरवस्था**
- **नागरिकांचा संताप, तातडीने दुरुस्तीची मागणी**

। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा शहरातील मोरेआळी येथून हनुमान टेकडी मार्गे तांबडीकडे जाणारा प्रमुख रस्ता सध्या अत्यंत खड्डेमय आणि धोकादायक बनला आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या साईडपट्ट्या अनेक ठिकाणी वाहून गेल्या असून, ठिकठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. परिणामी दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, या मार्गावर यापूर्वी किरकोळ अपघात घडले असून, भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तांबडी परिसरात बाहेरगावाहून पर्यटकांची ये-जा सुरू असते. मात्र, खराब रस्त्यामुळे पर्यटकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत असून, परिसराच्या प्रतिमेलाही धक्का बसत आहे. या पार्श्वभूमीवर समाजसेवक बिलाल अकबर मोर्बेकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रोहा कार्यालयात निवेदन देऊन सदर रस्ता साईडपट्टीसह नव्याने करण्याची मागणी केली आहे. अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष पाहणी करून तक्रारी नोंदवल्याचे त्यांनी सांगितले. लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, रस्त्याची दयनीय अवस्था दर्शविणारे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरत आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना सार्वजनिक बांधकाम विभाग, रोहा येथील उपअभियंता बागुल यांनी सांगितले की, संबंधित रस्त्याच्या कामाचा समावेश चालू अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. निधी मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाईल. त्याआधी रस्त्यालगत असलेल्या झाडे-झुडपांच्या कटिंगचे काम करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

एकूणच, वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर मोरेआळीहनुमान टेकडीतांबडी मार्गाची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाची हमी देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## अकरा महिन्यांची प्रतीक्षा संपली

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

तब्बल ११ महिन्यांपासून बंद असलेली आधार नोंदणी व अद्ययावत सेवा अखेर श्रीवर्धनमध्ये पुन्हा सुरू झाली आहे. स्थानिक पातळीवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर अवघ्या ४८ तासांत तहसील प्रशासनाने पुढाकार घेत तहसील कार्यालयातील सेतू केंद्रात सेवा कार्यान्वित केली. या निर्णयामुळे हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आधार सेवा बंद असल्यामुळे नागरिकांना नोंदणी, पत्ता बदल, मोबाईल क्रमांक लिंकिंग, बायोमेट्रिक अपडेट आदी कामांसाठी बोर्ली पंचतन, म्हसळा, महाड, माणगाव या ठिकाणी ४० ते ६० किलोमीटरचा प्रवास करावा लागत होता. प्रश्न अधोरेखित झाल्यानंतर तहसीलदारांनी तातडीची बैठक घेऊन सेतू केंद्र समन्वयक, तांत्रिक अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. बंद पडलेली बायोमेट्रिक यंत्रणा दुरुस्त करण्यात आली तसेच आवश्यक उपकरणांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली. सेवा सुरळीत चालावी यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. आधार सेवा पुन्हा सुरू झाल्याने शिष्यवृत्ती अर्ज, वृद्धापकाळ पेन्शन प्रस्ताव, पीएम किसान योजना, बँक खाते लिंकिंग तसेच जात व उत्पन्न प्रमाणपत्रांसारखी अनेक रखडलेली कामे मार्गी लागण्यास मदत होणार आहे. दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागली; मात्र आता सेवा सुरू झाल्याने समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. वाढती गर्दी लक्षात घेता अतिरिक्त काऊंटर सुरू करावेत, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

## १४ मार्चला जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात दि. १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे.

या लोक अदालतीत जिल्ह्यातील सर्व न्यायालयांतील प्रलंबित दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, त्यांची अपिले, मोटार अपघात दावे, विवाह विषयक प्रकरणे तसेच ग्रामपंचायतींची घरपट्टी/पाणीपट्टी देयके, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीज वितरण कंपनी, राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था व इतर वित्तीय संस्थांची थकबाकी अशी वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

### लोक अदालतीचे फायदे

कोणतीही न्यायालयीन फी आकारली जात नाही. निवाडा अंतिम व बंधनकारक; अपीलाची तरतूद नाही. साक्षी-पुरावे, उलटतपासणी व दीर्घ युक्तिवाद टाळले जातात. कायद्यानुसार भरलेली कोर्ट फी परत मिळते. वेळ, पैसा व श्रम यांची बचत होते.

# रंगबेरंगी पिचकाऱ्या बाजारात दाखल

- **किमतीमध्ये पाच टक्क्यांनी वाढ**
- **धूलिवंदनानिमित्त बाजारपेठा सजल्या**

। उरण । प्रतिनिधी ।

संपूर्ण महाराष्ट्रात होळी व रंगपंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. राज्यासह रायगड जिल्ह्यात होळीनंतर दुसऱ्या दिवशी रंगपंचमी सण साजरा केला जातो. यानिमित्त एकमेकांच्या अंगावर रंगांची उधळण केली जाते. त्यासाठी लागणारे पर्यावरणपूरक रंग तसेच वेगवेगळ्या आकाराच्या व रंगांच्या पिचकाऱ्या जिल्ह्यातील प्रत्येक बाजारात दाखल झाल्या आहेत. उरण तालुक्यातील बाजारपेठेमध्येही पिचकाऱ्या व रंग मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. यंदा मात्र रंगासह पिचकाऱ्यांच्या किमतीमध्ये पाच टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एका वस्तूमागे किमान ५ रुपये अधिक मोजण्याची वेळ ग्राहकांवर येणार आहे.



धुलिवंदननिमित्त रंगांची उधळण करण्याचा खेळ ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी साजरा केला जातो. ही परंपरा आजही जपली जाते. यावर्षी यंदा सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी होळी आहे. होळी उभारून पारंपरिक व धार्मिक पद्धतीने विधीवत पूजन केले जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. ३) धुलिवंदन आहे. या दिवशी सकाळपासून सर्वच ठिकाणी रंगांची उधळण केली जाणार आहे. एकमेकांच्या अंगावर रंग उडवून धुलिवंदनाचा आनंद लुटला जाणार आहे.

### शेकडो वर्षांची परंपरा अबाधित

उरणमध्ये काही ठिकाणी होळीच्या दहा दिवस अगोदर लहान होळी पेटविण्याची परंपरा आहे. उरण शहरातील देऊळवाडी येथे शीतळादेवी मंदिरासमोर दरवर्षी होळीच्या दहा दिवस अगोदर छोटी होळी पेटविली जाते. अंदाजे १०० वर्षांहून जास्त वर्षांची ही परंपरा आजच्या २१ व्या युगातही तरुण मोठ्या आनंदाने व उत्साहाने जपली आहे.

# मुरूड आगारात सीएनजी पंपाची शक्यता धुसर

- **स्थानिक नागरिकांसह प्रवाशांत नाराजी**

। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी ।

मुरूड एसटी आगारात सीएनजी गॅस पंप उभारणीचा प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने स्थानिक नागरिक आणि प्रवाशांत नाराजीचे वातावरण आहे. सर्वेक्षण पूर्ण होऊनही अंतिम निर्णय न झाल्याने पंप सुरू होण्याची शक्यता सध्या धुसर झाल्याचे समजते.



मुरूड आगारातून मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या बहुतेक एसटी बस सीएनजीवर चालतात. मात्र, आगारात सीएनजी पंप उपलब्ध नसल्याने बसांना अलिबाग किंवा अन्य ठिकाणी गॅस भरण्यासाठी जावे लागते. त्यामुळे किमान अर्धा तास अतिरिक्त थांबा घ्यावा लागतो. परिणामी वेळापत्रक बिघडते, प्रवाशांचा खोळंबा होतो आणि चालक-वाहकांना नाराजीचा सामना करावा लागतो.

मुरूड-जंजिरा हे कोकणातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ आहे. ऐतिहासिक जंजिरा किल्ला, पद्मदुर्ग, समुद्रकिनारे आणि निसर्गसौंदर्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात. अनेक पर्यटक एसटी सेवेचा वापर करतात; मात्र सीएनजी पंपाअभावी सेवा व्यवस्थापनात अडचणी येत असल्याचे चित्र आहे. मुरूड आगारातील सुमारे ३० बस सीएनजीवर धावत असून, केवळ काहीच बस डिझेलवर आहेत. गॅस भरण्यासाठी अलिबाग येथे थांबावे लागत असल्याने प्रवाशांना प्रतीक्षा करावी लागते. काही प्रवासी मुरूड-अलिबागपर्यंतच तिकीट काढून पुढील प्रवासासाठी दुसरी बस पकडतात, त्यामुळे आगाराच्या उत्पन्नावरही परिणाम होत असल्याची चर्चा आहे.

## उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी १५ मार्चपर्यंत प्रवेशिका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यामार्फत उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत १५ मार्च असून, पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम पुरस्कार तसेच स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कारांचा समावेश आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील कामगिरीच्या आधारे प्रवेशिका स्वीकारण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी राज्य शासनाचे अधिकृत संकेतस्थळ तसेच महासंचालनालयाचे संकेतस्थळ आणि 'महासंवाद' ब्लॉगवर माहिती उपलब्ध आहे. इच्छुक पत्रकारांनी अंतिम मुदतीपूर्वी जिल्हा माहिती कार्यालयात प्रवेशिका सादर कराव्यात.

**सरपंच हर्षदा मयेकर यांच्या पाठपुराव्याला यश** | **प्रकल्पासाठी आवश्यक जागा भाडेतत्वावर**

# नागावच्या सबस्टेनचा मार्ग मोकळा

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, डावाळे परिसरात प्रस्तावित स्विचिंग स्टेशन/एमएसईबी सबस्टेशन प्रकल्पासाठी आवश्यक जागेचे भाडेतत्त्वावर हस्तांतरण अधिकृतरित्या पूर्ण झाले आहे. अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेली प्रक्रिया पूर्ण झाल्याने प्रकल्प मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

निसर्ग चक्रीवादळानंतर या प्रकल्पाची संकल्पना पुढे आली होती. त्यानंतर प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. गेल्या दोन महिन्यांपासून अंतिम टप्प्यात असलेली प्रक्रिया आता पूर्णत्वास गेल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले. या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे, तहसीलदार विक्रम पाटील, एमएसईबीचे मुख्याधिकारी शैलेश कुमार, नोंदणी अधिकारी सोपेकर, माजी सरपंच निखिल मयेकर तसेच माजी बांधकाम सभापती राजेंद्र मयेकर यांचे सहकार्य लाभल्याचे नमूद करण्यात आले.



सध्या थळ येथील सबस्टेशनवरून कोर्लईपर्यंतच्या लाईनद्वारे नागाव परिसराला वीजपुरवठा केला जात आहे. वाढत्या विद्युत भारामुळे कमी व्होल्टेज, वारंवार वीजखंडित होणे, व्होल्टेज फ्लक्चुएशन आणि अनियमित पुरवठा यांसारख्या समस्या नागरिकांना भेडसावत आहेत. डावाळे येथे उभारण्यात येणाऱ्या नव्या स्विचिंग स्टेशन/सबस्टेशनमुळे नागावसह परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर आणि कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

> गावाच्या विकासासाठी आणि दीर्घकाळ प्रलंबित समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नागाव ते कोर्लईपर्यंतच्या गावांना थेट लाभ होईल.
> - हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव

# अनधिकृतपणे पाणी चोरणाऱ्यांवर कारवाई

## १४ पंप जप्त; कडक पोलीस बंदोबस्तमध्ये नगर पालिकेकडून धाडसत्र

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहे अष्टमी भागात गेली अनेक महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. काही नळधारक बेकायदेशीरपणे विजेचा पंपाचा वापर करुन त्याद्वारे पाणी घेत असल्यामुळे इतर लगतच्या नळधारकांना पुरेसा पाणी मिळत नाही. वीज पंपाचा वापर करुन गैर मार्गाने पाणी खेचणाऱ्या नळधारकांवर कायदेशीर कारवाई करुन आम्हला देखील आमच्या हक्काचे मिळावे, अशी मागणी जनतेतून होत असताना रोहा नगर पालिकेच्या पथकाने भल्या पहाटे नागरिक झोपेत असताना चक्क कडक पोलीस बंदोबस्तमध्ये कारवाईला सुरुवात केली. या धाडसत्रात १४ ठिकाणी लावण्यात आलेले बेकायदेशीर विजेचे पंप जप्त करण्यात आले.



मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा विभागाचे अभियंता ओंकार भुरण, आरोग्य निरीक्षक मनोज पुळेकर यांच्या नेतृवाखाली पोलीस अधिकारी व नगरपालिका कर्मचारी यांच्या विशेष पथकाकडून ही कारवाई करण्यात आली.

रोहा नगर पालिकेकडून पुरवठा करण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या नळाला थेट विजेचा पंप लावून बेकायदेशीररित्या पाणी घेण्याचे प्रकार सरार्सपणे घडत आहे. या नियमबाह्य आणि अनधिकृत पाणी चोरीमुळे रोहे अष्टमी शहरातील त्या-त्या भागातील पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम होत असून लगतच्या नळधारकांना पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांत पाण्यासाठी बोंबाबोंब होत आहे.

विजेचा पंपाचा वापर होत असल्याने सामान्य नळधारकांना पुरेसा पाण्यापासून वंचित राहावे लागते. नियमबाह्य विजेचा पंपाचा वापर करणे बंद न केल्यास त्या ग्राहकांवर नगर परिषद प्रशासनाकडून दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा काही दिवसापूर्वी शहरातील प्रमुख चौकात होर्डिंग बॅनर्स लावून, पत्रकद्वारे तसेच रिक्षातून दवंडीद्वारे रोहा नगर पालिका प्रशासनाकडून देण्यात आला होता. विजेचा मोटरचा वापर करुन नये, असे वारंवार आवाहन करण्यात आले. मात्र तरीदेखील काही ठिकाणी विजेचा पंपाचा खुले आमपणे वापर होत असल्याने मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्या आदेशानुसार शनिवारी पहाटे पोलीस बंदोबस्तमध्ये कारवाई सुरु करण्यात आली. अष्टमी प्र.क्र.१ व प्र.क्र.२मध्ये या धडक कारवाईला सुरुवात करण्यात आली. या भागातील १४ जणांविरोधात कारवाई करुन त्यांच्याकडील विजेचे पंप जप्त करण्यात आले.

> “बेकायदेशीर विजेचे पंप वापरून नियमबाह्य पाणी घेण्याचे प्रकार थांबविण्यासाठी न.प. प्रशासनाकडून विशेष पथक तयार करण्यात आले आहेत. थेट नळ संयोजनाला वीज पंप जोडून पाणी घेत असल्याचे आढळून आल्यास संबधित वीज पंप तात्काळ जप्त करण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे. जप्त केल्यानंतरही पुन्हा विजेचा पंप जोडून पाणी घेत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर पंप जप्त करून ५ हजार रु. दांडात्मक कारवाई व संबधित व्यक्ति विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी नगर पालिकेला सहकार्य करावे.
> – अजयकुमार एडके, मुख्यधिकारी”

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमिन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक सौ. ज्योती आर्केश पाटील यांचेसोबत चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| सहाण ता. अलिबाग | ३३ | ०.४०.२० | ८.९४ |

वर नमूद सामाईक मिळकतीपैकी सौ. ज्योती आर्केश पाटील यांच्या ‘अविभक्त हिश्श्याच्या’ मिळकतीच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १/३/२०२६

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणारी घर मिळकत, अशी संपूर्ण मिळकत सौ. उज्वला अरविंद खोत, रा. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकत निरंतर वहिवाटीच्या रस्त्याच्या हक्कासहीत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी, सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पुर्ण झाली आहेत. सदरील मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील सौ. उज्वला अरविंद खोत यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, रस्त्याची वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकती पुर्णतः निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | १९४३/१/६ | ०-०५-००<br>०-००-१० (पो.ख.)<br>०-०५-१० एकूण | ०१-३९ |

सदर बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणारी ग्रुप ग्रामपंचायत चौल कडील घर क्रं. ३२८४, ही घर मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०२/०३/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, फ्लॅट नं. २,
अे विंग, तळमजला टिळक रोड,
अलिबाग- रायगड. खरेदीदारांचे वकील

# महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

। रोहा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार रोहे तालुक्यात सर्व महसूल मंडळ विभागात आठ दिवस छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्यात आले आहे. नियोजित दिवशी विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून या शिबिराचे लाभ घ्यावे, असे आवाहन रोहा तहसीलदार किशोर देशमुख यांनी केले आहे.

या नियोजित शिबिरात चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना विशेष करुन इ.१०वी व १२ च्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश मिळवण्यासाठी लागणारे जातीचे दाखले, रहिवाशी दाखले, वय व अधिवास दाखले, उत्पन्नाचे दाखले,आधारकार्ड असे आवश्यक विविध प्रकारचे दाखले प्रवेशापूर्वीच वेळेत केंद्र प्रमुख व तालुका शिक्षणाधिकारी यांची सभा घेऊन ग्राम महसूल अधिकारी (तलाठी ) व ग्राम पंचायत अधिकारी (ग्रामसेवक) यांच्याकडून आवश्यक पुरावे गोळा करुन महसूल मंडळातील शिबिरात विद्यार्थी वर्गाला दाखले वाटप करण्यात करण्यात येणार आहेत.

सर्व केंद्रात हे शिबीर सकाळी ११ वा. सुरु होणार असून कोलाड येथे ७ मार्च, नागोठणे १४ मार्च, चणेरा १०एप्रिल, घोसाळे १७ एप्रिल, निडी तर्फे अष्टमी १ मे, तर रोहा नगर पालिका हद्दीत दि.८ व १५ मे रोजी होणार आहे. या शिबिराचा पालक व विद्यार्थी वर्गाने लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार किशोर देशमुख यांनी केले आहे.

# सण, उत्सवात सलोखा जपूया

## सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांचे आवाहन

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यात विविध धर्मीय नागरिक आपापले सण उत्सव परंपरेनुसार आनंदात साजरे केले जातात. ही सलोख्याची परंपरा कायम ठेवत होळी उत्सव, पवित्र रमजान रोजे, ईद तसेच पुढील सण उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तालुका सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी शांतता समिती बैठकीत केले. अधिक बोलताना त्यांनी राज्यात गोधन चोरी व गोहत्या बंदी घातली असताना कायदा मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच, सणांच्या काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी योग्य नियोजन केले जाईल, असे आवर्जून सांगितले.



सभेत तालुका हिंदू समाज अध्यक्ष समीर बनकर, माजी सभापती महादेव पाटील, शहर हिंदू समाज सचिव सुशील यादव, मुस्लिम समाज उपाध्यक्ष डॉ.मुब्बशीर जमादार, जिल्हा शांतता समिती सदस्य अशोक काते, फारुख पेणकर आदी उपस्थितांनी चर्चेत सहभाग घेतला. सण उत्सव साजरे करताना हिंदू-मुस्लिम समाजात एकता व बंधुभाव कायम राखत वाईट प्रवृत्तींचा बीमोड करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

समिती सदस्यांनी धार्मिक भावना दुखावून सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना पोलीस निरीक्षक पारखे यांनी कायदा हातात घेऊ नये, कोणतीही समस्या असल्यास पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे सांगितले. तसेच सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करताना त्यांनी नागरिकांना सावधगिरीचे आवाहन केले. अनोळखी ॲप डाउनलोड करू नये, फसवणूक करणारे कॉल स्वीकारू नयेत, एपिके फाईल अपलोड करू नये, असे मार्गदर्शन करण्यात आले.

तालुक्यातील मजबूत सामाजिक व्यवस्था आणि नागरिकांचे सहकार्य यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण कमी असल्याचे त्यांनी नमूद केले. शेवटी त्यांनी सर्वांचे आभार मानत हिंदू बांधवांना होळीच्या आणि मुस्लिम बांधवांना पवित्र रमजान व ईदच्या शुभेच्छा दिल्या.

(जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक, निविदा-०४१७/(प्र.क्र. २४७/१७) मोप्र-१/ दि:-१८/१०/२०२३)

## निविदा सूचना

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय ई मेल पत्ताः- eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com. दुरध्वनी-०२१४३-२७८०११

**ई निविदा सूचना क्र. ०६ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रायगड जिल्ह्यातील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब- नमुन्यातील ई-प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय किंमत | इसारा रक्कम | काम पुर्ण करायचा कालावधी | निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेटवणे धरण माथावरील चौकी दुरुस्ती समोर शेड बांधणे व विद्युत ट्रान्सफार्मर सभोवताली Paver block बसविणे, बागबगीचा करणेची कामे. | रु.४१,५७,६६४/- | रु.४२,०००/- | ०६ महिने (पावसाळ्यासह) | रु.२,०००/- + ३६०/- (१८% GST) एकूण रू. २३६०/- | रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार नोंदणीकृत कंत्राटदार |
| २ | हेटवणे धरण थेट पोहोच रस्त्याच्या उजव्या बाजूला साखळी क्र. ८० ते १२० येथे सिमेंट काँक्रीटची संरक्षण भिंत बांधणे. | रु.२२,७०,६२१/- | रु.२३,०००/- | ०६ महिने (पावसाळ्यासह) | रु.२,०००/- + ३६०/- (१८% GST) एकूण रू. २३६०/- | रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार नोंदणीकृत कंत्राटदार |

**दुबार ई निविदेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | | सुरूवात दिनांक | सुरूवात वेळ | समाप्ती दिनांक | समाप्ती वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री आणि डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. ०५.०३.२०२६ | स. ११.०० | दि. १२.०३.२०२६ | सायं. १८.०० |
| २ | बिड सबमिशन करण्याचा कालावधी | दि. ०५.०३.२०२६ | स. ११.०० | दि. १२.०३.२०२६ | सायं. १८.०० |
| ३ | तांत्रिक लखोटा उघडणेचा दिनांक व स्थान | दि. १३.०३.२०२६ | सायं. १८.०० | कार्यकारी अभियंता हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली ता. पेण, जि. रायगड | |

खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली पेण कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
**(दि.का. राजभोज)**
कार्यकारी अभियंता,
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली
ता. पेण, जि. रायगड

जा.क्र.हेमप्रवि/लेशा-१/ई-निविदा/४३०/२०२६
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड
दिनांक : २५/०२/२०२६

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/३१९**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | संपादित गांव निवाडा क्र. | सर्व्हे क्र/ हि. क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | करंजाडे ३७९ | करंजाडे १+२+ ९+११+ २५९+ २३०(E) | ९१/१ब | ०-४२-५ | ३५० चौ.मी. | नोड – करंजाडे भूखंड क्र. १६, सेक्टर-०६, क्षेत्र-३४९.९२ चौ.मी. | **मुळ भूधारक.– कै. गंगूबाई गणू करांदे (मयत) दि.०६.०८.१९८५ कै. रामा गणू ऊर्फ गणा करांदे (मयत) दि. २०.१२.२००५ कै. जानकी ऊर्फ जानकीबाई रामा करांदे (मयत) दि.०८.०८.२०१३ यांचे वारस**<br>१) सौ. उषा उर्फ कल्पना हनुमंत धनिवले उर्फ उषा उर्फ कल्पना रामा करांदे २) श्री. संदीप रामा करांदे ३) सौ. वचना यशवंत करांदे उर्फ वचना रामा करांदे<br>वारस दाखला क्र. CMA No. ५८/२०२५<br>दिवाणी चौकशी अर्ज ५८/२०२५<br>**हक्कसोड पत्र लिहून घेणार:** श्री. संदीप रामा करांदे<br>**हक्कसोड पत्र लिहून देणार:** १) सौ. उषा उर्फ कल्पना हनुमंत धनिवले उर्फ उषा उर्फ कल्पना रामा करांदे २) सौ. वचना यशवंत करांदे उर्फ वचना रामा करांदे ३) ताई उर्फ यमुना अनंता भोपी ४) इंदू उर्फ इंदुबाई मधुदा उर्फ मधुकर धनिवले | **श्री. संदीप रामा करांदे** यांचे नावे भूखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | | | **०-४२-५** | | | | |
| २ | तळोजा ३९५ | पेंधर १/२००८<br>पेंधर १८५/ब<br>२९९ अ | २५७/१/२<br>३९/१पै<br>३९/५<br>४८/२बी | ०-६०-०<br>०-०४-३<br>०-२८-८<br>०-१२-० | ९०० चौ.मी. | भुखंड क्र. १४, सेक्टर-८, क्षेत्र-८९९.९४ चौ.मी. | मुळ भूधारक कै.नामदेव बुध्या पाटील (मयत) यांचे वारस १) मोतीराम नामदेव पाटील २) पुंडलिक नामदेव पाटील ३) कृष्णाबाई कृष्णा पाटील ४) सिताबाई भास्कर म्हात्रे | निरंक |
| ३ | उलवे ८८३ | वहाळ ४७७<br>वहाळ १३५ | ४८७/४<br>५००/२<br>२७३/५<br>४७५/३<br>४८१/४<br>५०२/३ | ०-४-५<br>०-४-०<br>०-१०-०<br>०-६-०<br>०-३३-०<br>०-२२-० | ७५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. A-२५, सेक्टर-१३, क्षेत्र-७४९.८५ चौ.मी. | मूळ भूधारक कै. गोपाल अंबाजी घरत उर्फ पाटील (मयत) यांचे वारस १)श्रीमती पार्वतीबाई गोपाल पाटील २) श्री. प्रल्हाद गोपाल पाटील, ३) श्री. कपिलमुनी गोपाल पाटील ४) श्रीमती वत्सला गजानन ठाकूर | -- |
| ४ | तळोजा २५४ | १०७/२०<br>१७७/२७३ | २४/३<br>९३/१<br>९३/२<br>९२/४अ<br>९५/६<br>९५/३<br>७४/५<br>९३/४<br>एकूण क्षेत्र | ०-०३-५<br>०-७२-९<br>०-११-०<br>०-४३-४<br>०-२६-०<br>०-७१-०<br>०-२७-९<br>०-२४-०<br>२-७९-७ | २४५० चौ.मी. पात्रते- पैकी २५० चौ.मी. | भुखंड क्र. ५०E, सेक्टर-५, क्षेत्र-२५० चौ.मी. | १) रझीया मैनुद्दीन पटेल २) अनवारी अख्तर शाह ३) शाहीद अली मोहम्मद अली अरशी ४) अमजदाली मोहम्मद अली अरशी ५)फारुक अब्दुल कादिर पटेल ६) असलाम अ.कदिर पटेल ७) गुलजार अब्दुल कादीर पटेल ८) शाहीदा अय्युब मुल्ला ९) महजबीन अब्दुल अजीज पटेल १०) सलमा म.शफी पटेल ११) शबाना अब्दुल समद पटेल १२) हिना मो.शफी पटेल १३) यासीन सादीक पटेल १४) मोहम्मद इरफान मोहम्मद सादीक पटेल १५) मोहम्मद ताहिर मोहम्मद सादीक पटेल १६) हसीना अजीज पटेल १७) शहनाज अ. मजी पटेल १८) नफीजा अ. रऊफ पटेल १९) अमिना बेगम अब्बास पटेल २०) रुख्साना अब्दुल लतीफ पटेल २१) मुन्नावेर अ.रेहमान पटेल २२) नाझीर अहमद अब्दुल रेहमान पटेल २३) शौकात अब्दुल रेहमान पटेल २४)इम्तियाज अ.रहमान पटेल २५) इलियास अ.रहमान पटेल २६)अ.करीम अ.रहमान पटेल २७) रिहाना अब्दुल हमिद पटेल २८)असिया रफीक पटेल | -- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**तळ मजला, सिडको भवन,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/५२९/२०२५-२६**

विनायक दळवी

## ओमान क्रिकेट संघाच्या प्रमुख प्रशिक्षक पदी सुलक्षण कुलकर्णी

आधुनिक ओमान क्रिकेटची व्याख्या करणाऱ्या युगाने एका नवीन अध्यायाला मार्ग दाखवला आहे. दुलीप मेंडिसच्या नेतृत्वाखाली जवळजवळ १४ वर्षांच्या परिवर्तनानंतर, ओमान क्रिकेट संघटनेने राष्ट्रीय संघाची सूत्रे सुलक्षण कुलकर्णी



यांच्याकडे सोपवली आहेत. अलिकडच्या काही महिन्यांत उपमुख्य प्रशिक्षक म्हणून संघासोबत जवळून काम करणारे कुलकर्णी १ मार्चपासून औपचारिकपणे राष्ट्रीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यभार स्वीकारतील. ओमान क्रिकेटच्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या व्यापक दिशेचे निरीक्षण करणारे मेंडिस मुख्य विकास अधिकारी म्हणून काम पाहतील. ओमान क्रिकेट सचिव मधु जेसराणी यांनी नेतृत्व बदल वेळेवर आणि उद्देशपूर्ण असल्याचे वर्णन केले.

नवीन ध्येये आणि नवीन कल्पनांसाठी आपण प्रयत्नशील असल्याने बदल घडवून आणण्याची वेळ आली आहे. नवीन विचारसरणी आणि नवीन आव्हानांसह, आम्हाला विश्वास आहे की सुलक्षण कुलकर्णी यांचा अनुभव नवीन जोम आणेल आणि संघाला नवीन उंचीवर नेईल, जेसराणी म्हणाले, गेल्या काही महिन्यांत आमच्या खेळाडूंसोबत कुलकर्णी यांनी जवळून काम केले आहे. त्यांच्याकडे भारतातील अग्रगण्य राज्यांच्या क्रिकेट संघांना प्रशिक्षित करण्याचा दांडगा अनुभव आहे.

कुलकर्णी यांनी त्यांच्याकडे असलेल्या जबाबदारीची विशालता मान्य केली. दुलीप मेंडिस सरांचा वारसा पूर्ण करणे हे एक मोठे काम आहे, परंतु मला चांगले करण्याचा विश्वास आहे. त्यांनी ओमान क्रिकेटसाठी चमत्कार केले आहेत, असे कुलकर्णी म्हणाले. ओमानचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती होणे हा एक मोठा सन्मान आहे. माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी मनापासून आभारी आहे, तसेच भविष्यासाठी स्पष्ट दृष्टिकोन ठेवून संघाच्या यशावर भर देण्यास वचनबद्ध आहे. ५९ वर्षीय कुलकर्णीकडे खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून व्यापक अनुभव आहे.

भारताच्या स्थानिक पॉवर हाऊस मुंबईचे माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटू, कुलकर्णी यांनी १९८५-८६ पासून १५ हून अधिक हंगामांसाठी राष्ट्रीय सर्किटमध्ये काम केले. ६१ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये, विकेटकीपरने ११७ झेल आणि २१ स्टंपिंग नोंदवले - रचना आणि शिस्तीने परिभाषित केलेल्या प्रशिक्षक कारकिर्दीचा पाया रचला. त्यांनी दोन हंगामांसाठी विदर्भाचे नेतृत्व करण्यापूर्वी आणि मध्य विभागीय संघाचे मार्गदर्शन करण्यापूर्वी मुंबईच्या १९ वर्षांखालील संघाचे प्रशिक्षकपद भूषवले. मुंबईचे मुख्य प्रशिक्षक म्हणून, त्यांनी मागील हंगामात उपांत्य फेरीत प्रवेश केल्यानंतर २०१२-१३ मध्ये संघाला रणजी करंडक विजेतेपद मिळवून दिले. त्यानंतर त्यांनी गेल्या ऑगस्टमध्ये ओमानला येण्यापूर्वी नेपाळ, भारताचा शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक विश्वचषक विजेता संघ, तामिळनाडू आणि महाराष्ट्र यांच्यासोबत भूमिका बजावल्या.

सध्या, मी एकामागून एक पाऊल पुढे टाकत आहे, कुलकर्णी पुढे म्हणाले. माझे प्राथमिक लक्ष नेपाळमधील आगामी क्रिकेट विश्वचषक लीग २ मालिकेवर आहे, जिथे आम्ही पुढील हंगामासाठी एक मजबूत संघ तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. संघ १० ते २० मार्च दरम्यान नेपाळमध्ये होणाऱ्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक लीग २ तिरंगी मालिकेतील पुढील कामगिरीपूर्वी ३० खेळाडूंच्या संचासह तयारी शिबिरासाठी एकत्र येईल, ज्यामध्ये यजमान नेपाळ आणि संयुक्त अरब अमिराती यांचा समावेश असेल. श्याम अय्यर, तसेच डॉ.आशिष अवस्थी (फिजिओ) आणि शिव मनहास (प्रशिक्षक) हे देखील विद्यमान सपोर्ट स्टाफमध्ये सामील होतील.

ओमान सध्या आठ संघांच्या क्रमवारीत चौथ्या स्थानावर आहे, २० सामन्यांत २४ गुणांसह, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, स्कॉटलंड आणि नेदरलँड्ससह आघाडीवर आहे. टॉप चारमध्ये स्थान मिळवल्याने क्रिकेट विश्वचषक पात्रता फेरीसाठी थेट ओमान संघ पात्र झाला होता.

# टी-२० वर्ल्ड कपवर युद्धाचा परिणाम

■ आयसीसीने यंत्रणा लावली कामाला
■ खेळाडूंसाठी मोठा दिलासा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |
पश्चिम आशियात सुरू झलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) बारकाईने लक्ष ठेवून आहे. भारतात सध्या सुरू असलेल्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेवर याचा थेट परिणाम होणार नसला तरी स्पर्धेशी संबंधित असलेल्यांच्या दुबईमार्गे परतीच्या प्रवासाची पर्यायी व्यवस्था करण्यास आयसीसीने विचार सुरू केला आहे.

पश्चिम आशायातील युद्धाचा स्पर्धेच्या आयोजनावर थेट परिणाम होत नसला तरी खेळाडू, संघ व्यवस्थापन, सामनाधिकारी, प्रसारण पथके आणि स्पर्धा कर्मचारी यांसह मोठ्या संख्येने कर्मचारी वर्ग आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण झाल्यानंतर आपल्या देशात परतण्यासाठी गल्फमधील हब विमानतळांवर, विशेषतः दुबईमार्गे परततात, त्यामुळे आयसीसीने लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. स्पर्धेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची सुरक्षितता ही आयसीची प्राथमिकता आहे. त्यांचा प्रवास आणि निवास व्यवस्थित व्हावा,




### आयसीसीने घेतला मोठा निर्णय

**आयसीसीने टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या दरम्यान मध्य पूर्वेमध्ये वाढत्या तणावामुळे सामनाधिकारी, ब्रॉडकास्ट टीम आणि इव्हेंट स्टाफ यांना आपल्या घरी परतायला अडचणी येऊ शकतात त्यासाठी आयसीसीने खेळाडूंच्या प्रवासासंदर्भात पाहणाऱ्या टीम्सना सक्रिय केलं आहे. आयसीसीने बड्या विमान कंपन्यांसोबत समन्वय साधत पर्याया मार्गाचा काही पर्याय उपलब्ध होतो का हे पाहत आहेत. आयसीसी ट्रॅव्हल अँड लॉजिस्टिक्स टीम आंतरराष्ट्रीय विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांशी संपर्क साधत कामाला लागली आहे. युरोपियन, दक्षिण आशियाई केद्रांच्या कनेक्शनसह पर्यायी मार्गांसह पाहून तिथून खेळाडूंना सुरक्षितपणे पोहोचवले जावू शकते.**

यासाठी आम्ही सुरक्षा पथकांना अगोदरच याची कल्पना दिली आहे. विनाअडथळा संबंधितांना त्यांच्या घरी परतता यावे, याची उपाययोजना आणि पर्यात तयार करण्यास आम्ही सुरुवात केली आहे, असे आयसीसीच्या प्रवक्त्याने सांगितले.

आयसीसीचे प्रवास आणि लॉजिस्टिक्स पथकाचे प्रमुख विविध आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांशी संपर्कात असून युरोप, दक्षिण आशिया आणि आग्नेय आशियात प्रवास करण्यासाठी इतर पर्यायांवर चर्चा करीत आहेत. आयसीसीचे सुरक्षा सल्लागार संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्कात असून तेही मार्गदर्शन करत आहे, याशिवाय आयसीसीचा प्रवास सपोर्ट डेस्कही कार्यन्वित करण्यात आला आहे.

आयसीसीने हे स्पष्ट केले आहे की, सुरू असलेल्या युद्धांचा टुर्नामेंटवर थेट काही परिणाम होत नाही. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकेमध्ये होत आहे. ८ मार्चला फायनल सामना होणार असून या स्पर्धेत एकूण २० संघांनी सहभाग घेतला होता. यामधील आता सेमी फायनलमध्ये तीन संघ फायनल झाले आहेत.

पाकिस्तान स्पर्धेतून बाहेर झाल्यामुळे आता सर्व सामने भारतामध्येच होणार आहेत. आयसीसीचे सुरक्षा सल्लागार हे अधिकाऱ्यांत्या संपर्कात असून परिस्थितीवर नजर ठेवून आहेत. त्यानुसा सल्ला देतील. आयसीसीने यासाठी एक ट्रॅव्हल सपोर्ट डेस्कही सक्रिय केला आहे. त्यामुळे वर्ल्ड कप झाल्यावर खेळाडूंची कोणतीही गैरसोय होणार नाही.

## मजगाव शाळेत वार्षिक क्रीडास्पर्धा

| कोर्लई | प्रतिनिधी |
मुरुड तालुक्यातील मजगांव येथील राजिपच्या आदर्श प्राथमिक शाळेत वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे नांदगाव केंद्राचे केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पूजा भोईर, केतन नाक्ती, निखिल मानाजी, योगेंद्र गोयजी, प्रथमेश म्हात्रे, क्रीडाप्रेमी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन सहभागी विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेचा उद्देश व खेळाचे महत्व पटवून दिले. क्रीडास्पर्धा प्रमुख चेतन चव्हाण यांनी खेळाडूंना शपथ देऊन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी मिथून भोईर व



संदीप कोटकर यांनी पंच म्हणून काम पाहिले. यास्पर्धेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी धावणे, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक तसेच खो-खो, कबड्डी व डॉजबॉल अशा सांघिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत आपले क्रीडाकौशल्य दाखविले. सांघिक खेळांमध्ये विविध संघांनी चांगली लढत दिली तर वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सहभाग नोंदविला. विजेत्या विद्यार्थ्यांना व संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाळासाहेब फुंदे, संतोष दहातोंडे, स्वप्नाली बाजी, हर्ष नांदगावकर व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व पालकवर्गाने परिश्रम घेतले.

## पीव्ही सिंधू दुबई एअरपोर्टवर अडकली

**दुबई :** भारताची दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू सध्या दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अडकली आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर, या प्रदेशातील हवाई सेवा पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. सिंधू प्रतिष्ठित ऑल इंग्लंड ओपनसाठी बर्मिंगहॅमला प्रवास करत होती, दुबई हा तिचा कनेक्टिंग पॉइंट होता. संघर्ष वाढत असताना, जगातील व्यस्त विमानतळांपैकी एक असलेल्या दुबई विमानतळावरील कामकाज थांबले. बॅडमिंटनची प्रतिष्ठित स्पर्धा, ऑल इंग्लंड ओपन, मंगळवारी (दि.३) मार्चला बर्मिंगहॅम येथे सुरू होणार आहे. सिंधूची तयारी आता पूर्णपणे उड्डाणे पुन्हा सुरू होण्यावर आणि पर्यायी मार्गांच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे.

## आट्यापाट्या खेळ लुप्त होण्याच्या मार्गावर

| सुकेळी | प्रतिनिधी |
कोकणवासियांचा महत्वाचा सण मानला जाणाऱ्या होळी सणाची धुमधाम रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यात जोरदार सुरु आहे. परंतु होळी सणाच्या काही दिवस अगोदर खेळल्या जाणाऱ्या पारंपरिक अशा आट्यापाट्यांचा खेळ हा पुर्णतः दुर्मिळ होण्याच्या मार्गावर दिसुन येत आहे कोठेही हा खेळ खेळतांनाचे चित्र दिसत नसल्यामुळे आट्यापाट्यांचा खेळ हा नामशेष होत चालला आहे. आट्यापाट्या हा महाराष्ट्रातील एक उत्कृष्ट असा मैदानी खेळ आहे. या खेळाचे खास वैशिष्ट्य म्हणजे एका संघातील खेळाडूंनी दुसऱ्या संघातील खेळाडूंना ठराविक जागेमध्ये म्हणजेच रेषा मारलेल्या चौकोनी खणामध्ये अडविणे व अडविलेल्या खेळाडुंना हुलकावणी देऊन सटकुन जाणे असे या खेळाचे खास स्वरुप आहे कोकणात हा खेळ होळी सणाच्या १० दिवस अगोदरपासूनच सुरू होतो. तसेच आढ्यापाट्या हा खेळ तर ग्रामीण भागामध्ये नावजलेला खेळ म्हणून मानला जातो. परंतु सद्यपरिस्थितीत आट्यापाट्या हा खेळ कोकणातुन हद्दपार होत आहे. पुर्वजांपासुन जपुन ठेवण्यात आलेला वारसा हा आता नामशेष होत आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारने या खेळासाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून आंतरराष्ट्रीय स्पर्धेत या खेळाचा समावेश केल्यास या खेळाला नक्कीच चांगले दिवस येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## 'डेरवण यूथ गेम्स'चे उद्घाटन

| चिपळूण | प्रतिनिधी |
डेरवणच्या क्रीडांगणावर जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट च्या लहरींमध्ये १२ व्या 'डेरवण यूथ गेम्स'चा उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास कमलेश जोशी, डॉ. सुवर्णा पाटील, शरयू यशवंतराव, श्रीकांत पराडकर, अजित गाळवणकर, संदीप तावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

एसव्हीजेसीटीच्या क्रीडासंकुलात ६ मार्चपर्यंत ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल टेनिस, जलतरण, तिरंदाजी, नेमबाजी, बुद्धिबळ, कॅरम, लंगडी, खो-खो, कबड्डी, मल्लखांब, बास्केटबॉल, फुटबॉल आणि व्हॉलीबॉल अशा विविध खेळांच्या स्पर्धा रंगणार आहेत. मुंबई, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद या भागांतून संघ डेरवण येथे दाखल झाले आहेत. सुमारे ७००० खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून स्पर्धा अटीतटीच्या होण्याची चिन्हे आहेत. यंदा विजेत्यांना १२०० पदके आणि ११५ करंडकांसह रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

## एमसीएच्या सामन्यांसाठी विनीत कुलकर्णी यांची नियुक्ती

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी|
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ गटाच्या दोन दिवसीय कसोटी फॉरमॅट नुसार घेण्यात येणाऱ्या क्रिकेट स्पर्धेतील सामन्यांचे सध्या रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर आयोजन करण्यात येत असून, पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर महाराष्ट्राचे पहिले युवा आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच (आयसीसी व बीसीसीआयचे पॅनल पंच) विनीत कुलकर्णी व महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय



देशपांडे यांची एमसीएतर्फे नियुक्ती करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पुढाकाराने एमसीएच्या सामन्यांचे आयोजन रायगड जिल्ह्यातील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, रसायनी येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्सच्या मैदान, गव्हाण उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, बेलापूर येथील सिडकोच्या मैदानावर ह्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षात रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ६० दोन दिवसीय कसोटी फॉरमॅट नुसार क्रिकेट सामन्यांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे.एमसीएच्या वतीने विनीत कुलकर्णी व अजय देशपांडे या दोन दिग्गजांची नियुक्ती सध्या रायगड जिल्ह्यातील मैदानाच्या व खेळपट्टीच्या स्तराची व दर्जाची पाहणी करण्यासाठी केली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षात जिल्ह्यातील क्रिकेट खेळला चालना देण्यासाठी अथक परिश्रम घेतले असून प्रत्येक वयोगटातील मुलामुलींची निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करून खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारावर निवड करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे.गेल्या दोन वर्षात आरडीसीएच्या वतीने जवळपास ६०० एकदिवसीय सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

## आदिवासी कन्या गाजविणार क्रिकेटचे मैदान

| नाशिक | प्रतिनिधी |
आदिवासी विकास विभागातर्फे एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल्सच्या ३५ विद्यार्थिनींसाठी गडचिरोलीमध्ये ९ दिवसांच्या क्रिकेट प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी विकास आयुक्त तथा महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी (नाशिक) च्या सदस्य सचिव लीना बनसोड यांच्या



संकल्पनेतून गडचिरोली जिल्ह्यात 'ईएमआरएस' गर्ल्स क्रिकेट टीम स्थापन करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला प्रकल्प अधिकारी अरुण एम. यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शिबिराचे उद्घाटन गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भोयर, नितीन पाटील, प्राचार्य परशुराम वांगदरे, धर्मेंद्र ठाकूर, मुख्याध्यापिका वंदना महल्ले आदी उपस्थित होते.

## हरमितची शिवाजी पार्क जिमखान्याला भेट

| मुंबई | प्रतिनिधी |
भारतात सध्या सुरू असलेल्या आयसीसी टिवेन्टी २० विश्वचषक स्पर्धेत युएसए संघाचे प्रतिनिधीत्व केलेल्या हरमित सिंगने फिरकी गोलंदाजीचे धडे ज्या शिवाजी पार्क जिमखाना अकादमीतून घेतले त्या शिवाजी पार्क जिमखान्याला भेट दिली आणि जुन्या आठवणीना उजाळा दिला.

मुंबईत जन्मलेल्या हरमित सिंगला शिवाजी पार्क जिमखाना अकादमीत



डावखुरा फिरकी गोलंदाज म्हणून प्रवेश मिळाला. अकादमीचे प्रमुख प्रवीण आमरे, पद्माकर शिवलकर यांचेकडून हरमितला योग्य मार्गदर्शन मिळाले. आयसीसीच्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत हरमितला भारतीय संघात स्थान मिळाले होते. २०२१ साली तो अमेरीकेमधील सिटल येथे स्थायीक झाला. आपल्या फिरकीची किमया दाखवत युएसए क्रिकेट संघात स्थान मिळवले. अकादमीतून घडलेल्या हरमितने अमेरीका संघातून विश्वचषक स्पर्धेत पदार्पण केले. यंदाची विश्वचषक स्पर्धा भारतात होत असल्याचा हरमितला वेळ मिळताच त्याने शिवाजी पार्क जिमखान्याल भेट देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली.

चित्रलेखा पाटील यांचे विशेष सहकार्य | निनाद स्पोर्ट्स आग्राव संघाची दुसऱ्यांदा बाजी

# नाईट बॉक्स क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात

| संतोष राऊळ |
| अलिबाग |
चौल बॉक्स क्रिकेट असो. च्या मान्यतेने, शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्याने व जान्हवी तळे क्रीडा मंडळ चौलतर्फे नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा शनिवारी (दि.२८) चौल येथील जान्हवी तळे पटांगणावर यशस्वी रित्या पार पडल्या. या मर्यादित ३ षटाकांच्या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता. तर, चुरशीच्या अंतिम सामन्यात निनाद स्पोर्ट्स आग्राव संघाने एकविरा भगवती संघाला नमवत दुसऱ्यांदा बाजी मारली आहे.

अलिबाग तालुक्यातील चौल



येथील जान्हवीचे तळे या ठिकाणी नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेसाठी शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, निलेश खोत, शरयु अधिकारी, अनुजा मोरे, अभिजीत वाळंज आदींसह शेकाप कार्यकर्ते, ग्रामस्थ व क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येन उपस्थित होते. तसेच, या स्पर्धेदरम्यान, शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, शेकाप कार्यकर्ते नितिन सारंग, मनिष कवळे, संतोष राऊळ आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी आणि मान्यवरांनी भेट दिली.

या स्पर्धेतील अंतिम सामना निनाद स्पोर्ट्स आग्राव व एकविरा भगवती यांच्यात रंगला. यावेळी प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या एकविरा भगवती संघाने ३ षटकांत २१ धावा ठोकल्या. त्यांनतर लक्षाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या निनाद स्पोर्ट्स संघाने २२ धावांचे लक्ष २.२ षटकांत सहज पार केले आणि लागोपाठ दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान पटकावला. यावेळी निनाद स्पोर्ट्स संघाच्या खेळाडूंनी व समर्थकांनी एकच जल्लोष केला. त्यामुळे एकविरा भगवती संघाला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. तसेच, या स्पर्धेत जाखमात चौल या संघाने तृतीय क्रमांक, तर क्लासिक कनेक्ट या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला.



तसेच, या स्पर्धेत सामनावीर रत्नेश वर्तक हा ठरला असुन उत्कृष्ट फलंदाज तरंग व उत्कृष्ट गोलंदाज सार्थक पिटनाईक हे ठरले. विजेत्या संघांना आणि उत्कृष्ट खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

तसेच, या स्पर्धेदरम्यान जान्हवी तळे क्रीडा मंडळातर्फे खास महिलांसाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. त्याला येथील महिलांचा उत्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी विजेत्या दोन महिलांना शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या तर्फे आकर्षक बक्षिस देण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जान्हवी तळे क्रीडा मंडळाच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच, या स्पर्धेचे यशस्वी नियोजन केल्याबद्दल विनय म्होत्रे व सहकार्यांचे चौल पंचक्रोशीतून कौतूक करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)